दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -१६७ शुक्रवार दि.२० फेब्रुवारी २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-167 Friday, Dt.20 February 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## अनेक राज्ये तोट्यात; रेवडी धोरण बंद करा

### मोफत खैरातीवर सर्वोच्च न्यायालय संतापले
### कर्ज मोठ्या प्रमाणात वाढल्याने चिंता

नवी दिल्ली : मोफत खैरात वाटपावर सुप्रीम कोर्टाने कडक शब्दात ताशेरे ओढले आहेत. मोफत योजनांमुळे अनेक राज्यातील सरकारवर कर्जाचा बोझा वाढला असून उत्पन्नही घटले आहे यावरून सुप्रीम कोर्टाने तीव्र नाराजी व्यक्त केली. कर्ज वाढत असतानाही मोफत योजना वाटल्या जात आहेत. याऐवजी रोजगार निर्मितीवर जास्त भर देणे आवश्यक आहे असे कोर्टाने म्हटले. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या खंडपीठाने ही महत्त्वाची टिप्पणी केली आहे.सरन्यायाधीशांच्या खंडपीठासमोर तामिळनाडू येथील वीज कंपनीशी निगडित एका प्रकरणावर सुनावणी सुरू होती. आम्ही टॅरिफ दर आधीच निश्चित केले होते असे वीज कंपनीचे म्हणणे होते तर आम्ही वीज मोफत केल्याचे सरकारने म्हटले. यावरून सरन्यायाधीशांनी नाराजी व्यक्त केली. जर सरकार मोफत पैसे, वीज अथवा इतर सुविधा देत राहील तर त्याचा खर्च कोण उचलणार? अखेर मोफत खैरात वाटपाचा भार करदात्या लोकांवरच पडणार आहे. सरकारने मोफत गोष्टी वाटण्याऐवजी रोजगार निर्मितीकडे जास्त लक्ष द्यायला हवे असं सरन्यायाधीशांनी सांगितले.



**नागरिकांना सुविधा देणे राज्याचे कर्तव्य**

त्याशिवाय अशाप्रकारे मोफत गोष्टी देत राहिल्या तर देशाचा आर्थिक विकास थांबेल. काही लोकांना शिक्षण अथवा मुलभूत आयुष्य जगणेही कठीण असते. त्या लोकांना सुविधा देणे राज्य सरकारचे कर्तव्य आहे. परंतु मोफत खैरात अशा लोकांच्या खिशात जातेय जे आधीच मजा करत आहेत. या अशा गोष्टींकडे सरकारने लक्ष द्यायला हवे ना? आम्हाला अशा राज्यांची माहिती आहे जिथे मोफत वीज दिली जाते. भलेही तुम्ही मोठे जमीनदार का असेना..तुम्हाला एखादी सुविधा हवी असेल तर त्यासाठी पे करायला हवे.

# मंत्र्यांसह तब्बल ४२ आमदारासमोर नवे संकट

### बिहारच्या राजकारणात खळबळ

पाटना : बिहार विधानसभा अध्यक्ष प्रेम कुमार यांच्यासह ४२ आमदारांना हायकोर्टात हजर राहावे लागणार आहे. प्रेम कुमार यांच्यासह ४२ आमदारांना हायकोर्टाने नोटीस जारी केली आहे. ही नोटीस मिळणा-यांमध्ये सत्ताधारी आणि विरोधकांमधील आमदारांचा समावेश आहे. यात ऊर्जा मंत्री विजेंद्र प्रसाद यादव यांचेही नाव आहे.

पाटना हायकोर्टाने ही नोटीस निवडणूक प्रतिज्ञापत्रात चुकीची माहिती दिल्याचा आरोप करणा-या याचिकेवर सुनावणी करताना दिली आहे. कोर्टाने या सर्व ४२ आमदारांना या आरोपांवर स्पष्टीकरण मागितले आहे. इतकेच नाही तर याचिकेचे गांभीर्य लक्षात घेऊन कोर्टाने सर्व ४२ आमदारांना दिलेल्या मुदतीतच नोटिशीला उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत. या नोटिशीमुळे बिहारच्या राजकारणात खळबळ माजली आहे.

**नोटीस मिळणा-यांमध्ये मंत्र्याचाही समावेश**

ज्या आमदारांना नोटीस मिळाली आहे. त्यात ऊर्जा मंत्री विजेंद्र यादव, माजी मंत्री भाजपा आमदार जिवेश मिश्रा, नबीनगर येथे जेडीयू आमदार चेतन आनंद, अमरेंद्र कुमार यांच्या नावाचा समावेश आहे. सर्वात मोठी बाब म्हणजे नोटीस मिळणा-यांमध्ये बिहार विधानसभा अध्यक्ष डॉ. प्रेम कुमार यांच्याही नावाचा समावेश आहे. हायकोर्टाच्या या नोटिशीमुळे सर्व आमदारांसमोरील अडचणी वाढणार आहेत.



हे संपूर्ण प्रकरण बिहार विधानसभा निवडणुकीत दाखल केलेल्या निवडणूक प्रतिज्ञापत्राशी जोडलेले आहे. संबंधित आमदारांविरोधात निवडणूक लढणा-या उमेदवारांनी पटना हायकोर्टात याचिका दाखल केली होती. या याचिकेत या सर्व ४२ आमदारांनी त्यांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रात अनेक माहिती लपवली. काही प्रकरणात निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेतही गोंधळ घातल्याचा आरोप आहे. या पहिल्या सुनावणीत हायकोर्टाने सर्व ४२ आमदारांना नोटीस जारी करत त्यांचे म्हणणं मांडण्यास सांगितले आहे. आता या आमदारांनी नोटिशीला उत्तर दिल्यानंतर पुढील सुनावणी सुरू होईल.

## आम्ही त्या महिलेस ओळखतही नाही, कोणत्याही चौकशीस तयार - फड पिता - पुत्राचे आव्हान

परळी ।प्रतिनिधी

नागपूर येथील रंजना नागपूरकर नामक महिलेने आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप केल्यानंतर परळीतील कैलास व निखिल फड या पिता पुत्रांनी स्वतःहून माध्यमांच्या समोर येत संबंधित महिलेचे आरोप फेटाळून लावले आहेत. सदरील महिलेला आपण ओळखत नाही, कधीही भेटलेलो नाही, कोणत्याही प्रकारे आपली व त्यांची भेट किंवा संवाद झालेला नाही, तरीही त्या आर्थिक गैरव्यवहार आणि बंदूक दाखवून धमकी दिल्याचा करत असलेला आरोप संपूर्णतः खोटा व तथ्यहीन असून, आपण मागील दहा वर्षांत कधी नागपूरला गेलो सुद्धा नाहीत. त्याचबरोबर संबंधित महिलेने सांगितलेला घटनाक्रम, त्यातील स्थळे व तारखा पाहून त्यांचे व आमचे कॉल डिटेल्स व मोबाईल लोकेशन काढावेत, संबंधित प्रकरणाचा व आमचा किंवा आ. श्री. धनंजय मुंडे यांचा कुठलाही संबंध नाही, किंवा कोणत्याही प्रकारच्या चौकशीसाठी आपण तयार असून, चौकशीत दोषी आढळलो, तर द्याल ती शिक्षा

(उर्वरीत पान २ वर)

### जातीमुळे सॉफ्ट टार्गेट, आम्हाला व आमच्या आडून धनंजय मुंडे यांना बदनाम करण्यासाठी कारस्थान - फड

**तर अब्रु नुकसानीचा दावा ठोकणार..**

दरम्यान एका विशिष्ट जातीचे असल्याने मागील काही दिवसांपासून आम्हाला सतत टार्गेट केले जात असून आमच्या आडून धनंजय मुंडे यांची देखील बदनामी केली जात आहे. बीड व नागपूर पोलिस अधीक्षक यांना आम्ही या प्रकरणी सखोल चौकशी करण्याची विनंती करत आहोत. आम्ही सर्व प्रकारच्या चौकशीसाठी पोलिस प्रशासनास सहकार्य करण्यासाठी तयार आहोत. मात्र संबंधित महिलेने केलेले आरोप धादांत खोटे व बदनामी कारक असल्याने त्यांच्या विरोधात कायदेशीर अब्रु नुकसानीचा दावा देखील दाखल करणार असल्याचे निखिल फड व त्याचे पिता कैलास फड यांनी म्हटले आहे.



बीड - हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्रीमंतयोगी राजे श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी बीड शहरातील शिवतीर्थ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून मानाचा मुजरा केला.व सर्व शिवभक्तांना शिव जन्मोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी युवा नेते दिपक घोडके पाटील, युवा नेते शामजी काकडे सह सर्व शिवभक्त उपस्थित होते.

## छत्रपती संभाजीनगर येथे प्रशस्त सहकार संकुलाची निर्मिती करा
### सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर




मुंबई ।प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर विभागीय ठिकाण असल्यामुळे सहकार विभागाची अनेक कार्यालये शहरात आहेत. नागरिकांच्या व सहकारी संस्थांच्या सभासदांच्या सोयीसाठी ही संपूर्ण कार्यालये एकाच छताखाली आणणे गरजेचे आहे. त्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे सहकार संकुलाच्या सोईसुविधा युक्त प्रशस्त इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करावे, असे निर्देश सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

या बैठकीला अतिरिक्त आयुक्त नागनाथ इगलेवार, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय सहनिबंधक संतोष बिडवाई, जिल्हा उपनिबंधक समृत जाधव, जागतिक बँक प्रकल्प अंतर्गत कार्यरत कार्यकारी अभियंता प्रिया पुजारी आदी उपस्थित होते.




नवगण राजुरी - यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे शिवजयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रम प्रसंगी जि. प. चे मुख्यकार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांचा सत्कार करताना गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत पवळ, पर्यवेक्षक दगडे व्ही. एन, कलाशिक्षक जयदीप सरवदे आदि.

## राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिरात ढोल ताशाच्या गजरात शिवजयंती जल्लोषात साजरा

धर्माबाद / अशोक पडोळे

धर्माबाद शहरातील राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर येथे दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहपूर्ण वातावरणात व मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक रॅली ढोल-ताशे व लेझीम पथकाच्या रॅली त विद्यार्थ्यांनी शिवघोष देत परिसरात देशभक्तीचे व शिवभक्तीचे वातावरण निर्माण केले. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी पदाधिकारी प्राचार्य सर्व शिक्षा करून उपस्थित होते.



या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय अधिकारी सौ. स्वाती दाभाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. दशरथ पाटील तसेच सिव्हिल सर्जन डॉ. नागेश डी. लखमावार उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिवाजी महाराजांचे धैर्य, शिस्त, नेतृत्वगुण आणि राष्ट्रप्रेम यांचा आदर्श जीवनात अंगीकारण्याचे आवाहन

(उर्वरीत पान २ वर)

## शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन महापुजन संपन्न

बीड ।प्रतिनिधी

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज सकाळी ७.०० छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन प्रतिमेचे शासकीय महापुजन करुन अभिवादन केले.या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनित कॉवत, जिल्हा शल्य चिकित्सक सतीशकुमार सोळंके, नगर परिषदेचे मुख्याधिकारी शैलेस फडसे,तहसीलदार चंद्रकांत शेळके, आमदार संदिप क्षीरसागर, अधिकारी, कर्मचारी, नागरिक, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.छत्रपती शिवजंयतीच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्यायभवन बीड येथुन सकाळी ९.०० वाजता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखवुन सुरुवात केली. रॅलीमध्ये आर्य भारत स्वयंसेवक, एनसीसी, एनएसएस पथक,स्काऊट गाईडचे विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते. रॅली माने कॉम्लेक्स मार्गे मार्गस्थ होऊन यशवंराव चव्हाण नाटयगृह येथे समारोप झाला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा क्रिडा अधिकारी, शिक्षक, शिक्षिका, संबधित अधिकारी, कर्मचारी ,नागरिक उपस्थित होते.

## परतूरच्या डॉ. शंतनू मोगल यांचे 'एफएमजीई' परीक्षेत दैदिप्यमान यश



परतूर ।तारेख शेख

परदेशात वैद्यकीय शिक्षण पूर्ण करणाऱ्या पदवीधरांसाठी अनिवार्य आणि अत्यंत कठीण मानली जाणारी भारत सरकारची 'फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट एक्झामिनेशन' (ऋचत्रए) परतूर येथील डॉ. शंतनू मीना हरिभाऊ मोगल यांनी पहिल्याच प्रयत्नात यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे. अत्यंत जिद्दीने त्यांनी मिळवलेल्या या यशामुळे त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून परतूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.डॉ. शंतनू मोगल यांनी आपले वैद्यकीय शिक्षण एमबीबीएस परदेशातून पूर्ण केले. नियमानुसार भारतात वैद्यकीय

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय....

# सातत्यपूर्ण पाठबळ हवे

आयटी क्षेत्रासाठी यंदाचा अर्थसंकल्प सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना यामुळे हे क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनामध्ये आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल.

भारतात आयटी क्षेत्राचा विस्तार वेगाने झाला. भारतातील या क्षेत्राची गेल्या पंचवीस वर्षांमधली प्रगती जुन्या-जाणत्यांनाही चकीत करणारी आहे. या क्षेत्राने दिलेल्या संधींचा फायदा घेत भारतीय तरुणाईने यशाची नवी शिखरे सर केलीच, पण समृद्धीही मिळवली. आज हे भारताच्या प्रगतीच्या प्रवासातले महत्त्वाचे क्षेत्र ठरते आहे. देशाच्या अर्थकारणात या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. कोणतेही उत्पादन न देता सेवेच्या बळावर हे क्षेत्र प्रगती करत आहे. अर्थात हार्डवेअर क्षेत्राचाही या ना त्या प्रकारे संबंध येत असल्याने एकूणच आयटी आणि संगणक क्षेत्र देशात हातात हात घालून प्रगती करत आहेत. त्यामुळेच या क्षेत्रातील घडामोडी, बदलत्या सरकारी तरतुदी, अमेरिकेसारख्या भल्या मोठ्या देशाचा या क्षेत्राच्या अर्थकारणात असणारा सहभाग महत्वाचा ठरतो. किंबहुना, अमेरिकेत सर्दी झाली तरी भारतात हुडहुडी भरते, असा प्रकार अनुभवायला मिळतो. असे अनेक घटक तपासत, समजून घेत आणि त्यांचा प्रभाव अनुभवत भारत या क्षेत्रातील वाटचाल सूकर करत असतो. गेले काही दिवस अमेरिका आणि भारताचे सातत्याने बदलत, वर-खाली होत असलेले संबंध आयटी क्षेत्रात तरंग उमटवत आहेत. कदाचित म्हणूनच व्हिसा किंवा नागरिकत्व देण्याच्या अमेरिकेच्या धोरणाबरोबरच भारतातील आर्थिक धुरीण या क्षेत्राच्या प्रगतीकडे कसे बघतात, त्याच्या समोर असलेल्या आव्हानांचा मागोवा कसा घेतात हे बघणे महत्वाचे ठरते. अमेरिकेत डोनाल्ड ट्रंप अध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून हे क्षेत्र काही विक्षिप्त निर्णयांना आणि तरतुदींना सामोरे जात आहेच, पण सातत्यपूर्ण बदलही अनुभवत आहे. त्याचेच प्रतिबिंब ताज्या अर्थसंकल्पामध्ये पहायला मिळाले.

केंद्रीय अर्थसंकल्प भारताच्या आर्थिक धोरणाचे प्रतीक असतो. माहिती तंत्रज्ञान अर्थात आयटी क्षेत्र हे भारताच्या जीडीपीमध्ये मोठे योगदान देणारे क्षेत्र असल्याने आयटीशी संबंधितांच्या अर्थमंत्र्यांकडून नेहमीच मोठ्या अपेक्षा असतात. भारताची अर्थव्यवस्था वेगाने बदलत असताना माहिती तंत्रज्ञान म्हणजेच आयटी क्षेत्र त्या बदलाचे प्रमुख इंजिन ठरले आहे. १९९०च्या दशकात सुरू झालेला संगणकीकरणाचा प्रवास आज कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, डेटा नॅलिटिक्स आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांपर्यंत पोहोचला आहे. या पार्श्वभूमीवर २०२६-२७ साठी सादर करण्यात आलेले केंद्रीय अंदाजपत्रक आयटी क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. हे अंदाजपत्रक केवळ आर्थिक आकड्यांपुरते मर्यादित न राहता भारताच्या डिजिटल भवितव्याची दिशा ठरवणारे आहे, असे म्हणणे वावगे ठरू नये.

## दर्याभवानी नाटकास बीडकरांचा उत्तम प्रतिसाद

बीड ।प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नाटक दर्याभवानी ४० कलाकारांच्या सादरीकरण कार्यक्रमास बीडकरांनी उत्तम प्रतिसाद दिल्यामुळे शासकीय कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमास जिल्हा क्रिडा अधिकारी अरंविद विद्यागर, तहसीलदार विनोद ननवरे सहाय्यक महसूल अधिकारी सविता दातार, साहित्यप्रेमी, लेखक, कलाकार, अधिकारी, कर्मचारी,नागरिक विद्यार्थी विशिष्ट मान्यवर उपस्थित होते. छत्रपती शिवजयंती निमित्ताने आयोजित केलेल्या नाटक दर्याभवानी, या नाटकास रसिकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. शासकीय कार्यक्रम व विनामुल्य होते याला रसिक श्रोत्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला, बीडकरांनी या पर्वणीचा हर्षभराने आनंद लुटला. रसिकांनी या कार्यक्रमास दाद दिल्याने दर्याभवानी नाटकांच्या संयोजक व कलाकारांनी आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाची सुरुवात प्रथम दिप प्रज्जवलनाने झाली आणि शिक्षक सुंदरराव कोटुळे यांनी आभार मानले.

### ध्यान धारणा ही शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्यासाठी

# एक प्रभावी गुरुकिल्ली आहे - योगतज्ञ डॉ. राधा तांबे (घोलप)



बीड ।प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने आर बी अट्टल महाविद्यालयात पतंजली योग समिती यांच्या संयुक्त विद्यमाने शांतता मास व शिवजयंतीनिमित्त आयोजित सात दिवसीय आनंदी जीवनाची गुरुकिल्ली योगा,प्राणायाम, ध्यानधारणा शिबिराचा प्रारंभ १९ फेब्रुवारी सकाळी ६ वाजता प्रसिद्ध योगतज्ञ,आंतरराष्ट्रीय योगपटू डॉ.राधा सचिन तांबे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.यावेळी डॉ.तांबे यांनी विविध योगा आसने,शारीरिक व्यायाम व शांततेसाठी ध्यानधारणा याबाबत मार्गदर्शन केले.

योगा सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात सुरुवातीस छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त महाराजांच्या प्रतिमेचे तसेच पतंजली ऋषी व रोटरीचे संस्थापक अध्यक्ष पॉल हॅरिश यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.उपस्थित मान्यवरांचे स्वागत पतंजली योग समिती व रोटरी क्लबच्या सदस्यांनी केले.तब्बल सव्वादोन तास डॉ तांबे यांनी प्रात्यक्षिकासह आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. रोटरी इंटरनॅशनलने सूचित केल्यानुसार फेब्रुवारी महिना शांतता मास मानला जातो.त्यानिमित रोटरी क्लब आणि गेवराईच्या वतीने

विश्वशांतीसाठी सर्वांनी एक तास ध्यान दान केले आणि जगात शांतता नांदावी, सर्वांचे कल्याण व्हावे, प्राणीमात्रात सदभाव निर्माण व्हावा, सुख, शांती, प्रेम, आनंद नांदावा या साठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

आपल्या मार्गदर्शनात संबोधन करताना डॉ .राधा तांबे म्हणाल्या की ,शांतता ही सदचार, ध्यान, शुभचिंतन केल्याने प्राप्त केली जाऊ शकते.आज चोहीकडे अशांतता दिसून येते, प्रत्येकजनाला शांतता हवी आहे, पण ती कशी मिळेल हे ठाऊक नाही.जगात चोहीकडे मानसिक रोग्यांचे प्रमाण वाढत चालले आहे.त्यावर एकच इलाज असू शकतो त म्हणजे आपल्या मनाला स्थिर ठेवणे .हे ध्यानानेच शक्य आहे.सर्व उपस्थितांना त्यांनी ऑनलाइन मेडिटेशन चा कोर्स करण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

राष्ट्रीय योगपटू सचिन मोहिते, योगशिक्षक उद्धव लाड व बाल योगपटू जय सुद्देवाड यांनी अत्यंत कठिण योगासने सहजरित्या करून दाखविली.उपस्थित योगसाधकांनी सुध्दा टाळ्या वाजवून कौतुक केले. शेवटी शांतिपाठ व हास्यासन घेऊन प्रथम दिनाच्या योग शिबिराची सांगता झाली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र बरकसे, सचिव प्रविण जैन, संचालक राजेंद्र डेंगे,डॉ.जगदीश पोतदार,राधाकिसन लड्डा,प्रोजेक्ट चेअरमन प्रा.आर डी मुंडे,धर्मराज करपे,उत्तम सोलाने ,आर बी अट्टल महाविद्यालयाचे डॉ.रविंद्र खरात,गौतम बोरुडे यांच्यासह पतंजली योग समितीचे सदस्य ,शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हरीश डोंबाळे यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघामध्ये निवड



इंदापूर ।प्रतिनिधी

कळंब येथील इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित विश्वासराव रणसिंग महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थी राष्ट्रीय सायकलपटू कुमार हरीश दीपक डोंबाळे याची गुरुनानक देव विद्यापीठ अमृतसर पंजाब येथे संपन्न होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सायकलिंग ट्रॅक इव्हेंट स्पर्धेकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघामध्ये निवड झाली आहे.

नुकत्याच महाळुंगे पुणे येथे आंतर विभागीय स्पर्धा संपन्न झाल्या.तेथील विजयी कामगिरीमुळे त्याची विद्यापीठ संघामध्ये निवड झाली. हा संघ पुणे येथून स्पर्धेकरिता १७ फेब्रुवारी रोजी पुणे येथून रवाना होत आहे.हरीश हा श्री शिवछत्रपती स्टेडियम महाळुंगे पुणे येथे या खेळाचा सराव करीत आहे. यापूर्वी शालेय स्तरावर देखील या खेळाडूने अनेक राष्ट्रीय स्पर्धांमध्ये महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. हरीश कडे असलेल्या उच्च दर्जाच्या कौशल्यामुळे त्याच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.या निवडीबद्दल प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीमती आनंदी काकी रणसिंग, उपाध्यक्ष श्री प्रकाशबापू कदम, सचिव श्री विरसिंह रणसिंग, खजिनदार सौ. वर्षा पाटील यांनी खेळाडूचे अभिनंदन व कौतुक केले. तसेच पुढील कामगिरी करिता शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी प्रतिष्ठानचे विश्वस्त श्री शंकरराव रणसिंग, श्री कुलदीप हेगडे, सौ. राही रणसिंग, महाविद्यालयाचे प्राचार्य अशोक काळंगे, उपप्राचार्य डॉ. प्रशांत शिंदे, श्री ज्ञानेश्वर गुळीग, श्री. दीपक डोंबाळे, महाविद्यालयाचा सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.या खेळाडूस महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. सुहास भैरट व प्रशिक्षक दीपाली पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड**
**यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २७५/२०२६**
**अ‍ॅड. पांडव जे. डी.**

**अर्जदार**

**१) अमृता विजयकुमार क्षीरसागर, वय-७७ वर्षे, धंदा- घरकाम, रा. जैन मंदिर समोर, जव्हेरी गल्ली, बीड ता. जि. बीड.**
**२) विश्वजित विजयकुमार क्षीरसागर, वय-३८ वर्षे, धंदा- खाजगींनौकरी,रा.जैन मंदिरसमोर, जव्हेरी गल्ली,बीड ता.जि. बीड.**
**३) श्रध्दा मनोज खंडागळे, वय-३४ वर्षे, धंदा- घरकाम, रा. गोडाउन गल्ली, जामखेड ता. जामखेड, जि. अ. नगर.**
**४) दिशा सचिन दुधाळ, वय-३२वर्षे, धंदा- घरकाम, रा. सव्हे नं.७०/१, एच.नो. ४३८/२, गजानन नगर, पिंगळे गुरव, पुणे**
**५) भक्ती विजयकुमार क्षीरसागर, वय-३० वर्षे, धंदा- घरकाम, रा. जैन मंदिर समोर, जव्हेरी गल्ली, बीड ता. जि. बीड.**

**विरुध्द**
**गैरअर्जदार : निरंक**

अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे विजयकुमार सभकारनराव क्षीरसागर यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे

मयत नामे विजयकुमार सभकारनराव क्षीरसागर, रा. जैन मंदिर समोर, जव्हेरी गल्ली, बीड ता. जि. बीड हे दिनांक १६/१०/२०२५ रोजी राहते जिल्हा रूग्णालय, बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क. ३, ४ व ५ या मयताच्या मुली आहेत. तसेच मयताचे वडील नामे सभाकरनराव अन्नाजी क्षीरसागर व मयताची आई नामे गयाबाई सभाकारनराव क्षीरसागर याचा देखील मृत्यु अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील दिनांक १७/०३/२०२६

आज दिनांक १८/०२/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशावरून**
**स्वाक्षरित**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड**



# श्री सिद्धेश्वर विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

स्व. आशा भावसार पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

माजलगाव ।प्रतिनिधी

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ वी जयंती येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशांत भानप (माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष), प्रमुख अतिथी जेष्ठ पत्रकार कमलेश जाब्रस, प्रमुख वक्ते श्रीमती आशालता करपुडे, तर व्यासपीठावर शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक विवेक जोशी सर, विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन प्रमुख अमोल ठाकुर, सहसंमेलन प्रमुख रामकृष्ण फुलझळके इत्यादी उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात शिबिर गीत, छत्रपती शिवाजी महाराज व पंचपरिवर्तन यांचे पूजन करून झाले. यानंतर कला विभागाच्या वतीने दिला जाणारा स्व. आशा भावसार पुरस्कार चि. सर्वेश संदीप गिल्डा व कु. मधुरा संभाजी राऊत या विद्यार्थ्यांना देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच प्रतिवर्षी साकार होणारा 'संगणकांचे अंतरंग' व 'चित्रमंजिरी' अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मातृ मंदिर विश्वस्त संस्था निगडी पुणे आयोजित समुह गीत गायन स्पर्धेत व पोवाडा गायन स्पर्धेत प्राप्त झालेल्या बक्षीसाचे वितरण करण्यात आले. यानंतर प्रमुख अतिथी कमलेश जाब्रस यांनी आपल्या मनोगतातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा परिचय दिला तसेच विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलनानिमीत्त आयोजित स्पर्धेत बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. तसेच प्रमुख वक्त्या श्रीमती आशालता करपुडे यांनी हिंदवी स्वराज्याची पार्श्वभूमी, इतिहास तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांची नेतृत्व याविषयी सविस्तर माहिती दिली. यानंतर विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन बक्षीस वितरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप प्रशांत भानप यांनी केले, प्रास्ताविक श्रीमती रोहिणी वाघीले यांनी केले. बक्षीसाचे वाचन रोहित खिंडरे व श्रीमती प्रज्ञा देशपांडे यांनी केले.आभार श्रीमती सारिका मुंडे व सुत्रसंचलन वरिष्ठ लिपिक श्रीकांत भुसारे यांनी केले. या कार्यक्रमाची सांगता शांती मंत्राने झाली. शांती मंत्र मंगेश मुळी यांनी सांगितला. शिबिर गीत चैतन्य आहेर व संगीत विभागाच्या चमुने सादर केले. यावेळी पर्यवेक्षक रवींद्र खोडवे सर, सदाशिव ढगे सर, कमलाकर झोडगे सर, परमेश्वर आदमाने सर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून...

**आम्ही त्या महिलेस...**

भोगायला तयार आहे, असे आवाहन परळीतील फड पिता पुत्रांनी केले आहे.

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या सह काही आजी - माजी मंत्री व पुढाऱ्यांचे नाव घेऊन पोलिस कर्मचारी असलेल्या आपल्या पतीला पोलिस चौकशीपासून वाचवण्यासाठी आपण मंत्रालयातील काही अधिकारी, माजी मंत्री तसेच फड पिता पुत्रांसह अनेकांची नावे रंजना नागपूरकर यांनी घेतली होती.

तसेच आपली फसवणूक झाली असून पैसे परत मागायला गेले असता फड पिता पुत्रांनी आपल्याला बंदूक दाखवून भीती घातली व जीवे मारण्याची धमकी देऊन हाकलून दिले, असाही आरोप केला होता. मात्र फड पिता पुत्रांनी हे आरोप फेटाळून लावत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी याबाबत सखोल चौकशी करण्याचे आवाहन केले आहे. सदर महिला रंजना नागपूरकर यांची आपली ओळख नाही, कधीही भेट किंवा संवाद झालेला नाही, मग आम्ही बंदूक कधी दाखवली? त्या जो घटनाक्रम आणि तारखा सांगत आहेत, त्याप्रमाणे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी चौकशी करून आमचे कॉल डिटेल्स, लोकेशन सर्व काढावेत, आमचा दोष आढळला तर आम्ही द्याल ती शिक्षा भोगू, असे म्हणत फड पिता पुत्रांनी आपल्याला व आपल्या आडून धनंजय मुंडे यांना सॉफ्ट टार्गेट केल्याचा गंभीर आरोप केला आहे.

**राजाराम काकाणी ....**

केले.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे शिवचरित्र उजागर केले. कु. मैथिली वडगावे हिने छत्रपती शिवाजी महाराजांवर प्रभावी भाषण सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. तसेच राजे आले राजे आले जिंकूनिया जगभरी या गीतावर आराध्या चव्हाण, इशिता स्वामी, अनुष्का सूर्यवंशी, दीपाली संबेटवार, स्वराली दमयावार, आरोही माने, महेश्वरी चिलकेवार, कनिष्का कांचने या विद्यार्थिनींनी उत्साहपूर्ण नृत्य सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची ठाकूर, भक्ती भोसले, जीवक पोवाडे, दिवीजा हमंद या विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासपूर्ण पद्धतीने केले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणांना उपस्थित पालक व मान्यवरांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संपूर्ण कार्यक्रमात शिवरायांच्या जयघोषाने वातावरण भारावून गेले होते.

**परतूरच्या डॉ. शंतनू ....**

व्यवसाय करण्यासाठी ही पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असते. अनेक विद्यार्थ्यांना ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अनेक प्रयत्न करावे लागतात, मात्र शंतनू यांनी अभ्यासातील सातत्य आणि चिकाटीच्या जोरावर पहिल्याच प्रयत्नात या परीक्षेत यश संपादन केले. त्यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर एक नवा आदर्श निर्माण झाला आहे.डॉ. शंतनू यांच्या या यशाबद्दल त्यांचे नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, गुरुजन आणि मार्गदर्शकांना दिले आहे. भविष्यात वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट सेवा देण्याचा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# जाफ्राबाद शहरात शिवजयंती उत्साहात साजरी

## भव्य शोभायात्रेत विद्यार्थ्यांचे बहारदार सादरीकरण

जाफराबाद ।प्रतिनिधी

जाफराबाद दि.१९ शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व दिमाखात साजरी करण्यात आली. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिवजयंतीनिमित्त शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नाटिका, देशभक्तिपर नृत्य, आकर्षक कवायती तसेच विविध सांस्कृतिक कलाविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. लेझीम पथक, ढोल-ताशांचा गजर आणि टाळ-मृदंगाच्या तालावर महिला भजनी मंडळाच्या सहभागामुळे वातावरण शिवमय झाले होते.

शहरातील अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यापासून शोभायात्रेला प्रारंभ झाला. ज्ञानसागर माध्यमिक शाळा शिपोरा अंभोरा, ज्ञानसागर माध्यमिक शाळा जाफराबाद, न्यू हायस्कूल जाफराबाद, समर्थ हायस्कूल जाफराबाद, पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला जाफराबाद, इंडियन पब्लिक स्कूल जाफराबाद, सिंहगड इंटरनॅशनल स्कूल जाफराबाद तसेच राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल जाफराबाद येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या बहारदार सादरीकरणामुळे संपूर्ण जाफराबाद शहर दुमदुमले होते.

अहिल्यादेवी होळकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक दरम्यान निघालेल्या या शोभायात्रेमुळे शहर भगवेमय झाले होते. विद्यार्थ्यांच्या डोक्यावर भगवे फेटे तर शिवप्रेमी नागरिकांच्या गळ्यात भगवे रुमाल यामुळे वातावरणात उत्साह संचारला होता. शोभायात्रेचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी महाराजांच्या जीवनकार्यावर भाष्य करून उपस्थितांना प्रेरित केले.

भोकरदन-जाफराबाद मतदारसंघाचे आमदार संतोष पाटील दानवे यांनीही विद्यार्थ्यांसोबत सहभाग नोंदवून जय शिवराय च्या घोषणांनी वातावरण भारावून टाकले व विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित केला.



कार्यक्रमास जाफराबाद नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ. कविताताई दिपक पाटील वाकडे, शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष दिपक पाटील वाकडे, उपाध्यक्ष संतोष पाटील लोखंडे, शालिकराम पाटील म्हस्के,नाना भागिले,रामधन कळंबे, दत्ता बंगाळे,सुरेश गवळी,सुरेश दिवटे,राजेश चव्हाण,उद्धव दुनगहू,राजू परिहार,राजेश म्हस्के,प्रभु गाढे साहेबराव कानडजे,गोविंदराव पंडित,राजु वाकडे,एकनाथ घाटगे,विशाल वाकडे,विलास चव्हाण,अनिल बोर्डे,राजीव गायकवाड,साहेबराव मोरे,नाना पंडित,राहुल वाकडे ,कौतिकराव राऊत ,डॉ.साखरे,अनिल वरगणे,निवृत्ती दिवटे,मुकेश भारद्वाज,प्रदीप बोबडे,संदीप वाकडे,अँड.शरद वाकडे,सागर लोखंडे,माऊली पाबळे,सोनू जैस्वाल,अंकुश वाकडे,मिलिंद पारवे,बाबुराव लहाने, सचिन जैस्वाल,मंगेश गायके,वैभव वाकडे,सिद्धेश्वर राऊत,कार्तिक वाकडे,आकाश वाकडे ओम वाकडे,आकाश पालोदे,तसेच तालुकाभरातून शिवप्रेमी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने कार्यक्रमाचे नियोजन शिस्तबद्ध व प्रभावी पद्धतीने करण्यात आले होते. नागरिक, पालक व युवकांच्या मोठ्या सहभागामुळे शिवजयंती सोहळा उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला.

## डब्ल्यूआयएफए फुटबॉल उपकनिष्ठ अजिंक्य स्पर्धेत

# आरकेएसव्हीएमच्या उत्कृष्ट नियोजनासह खऱ्या क्रीडास्पृहतेचे दर्शन - राहुल कर्डिले, जिल्हाधिकारी

धर्माबाद / अशोक पडोळे

राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर या सीबीएसइ शाळेने उत्कृष्ट नियोजनातून ग्रामीण भागात क्रीडा संस्कृतीचा आदर्श निर्माण केला आहे,असे प्रतिपादन नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

थशीींशीप खपवळर Football -ssociation (WIFA) आयोजित व राजाराम काकानी सहकार विद्या मंदिर प्रायोजित सब-ज्युनिअर आंतर-जिल्हा फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धा २०२५-२६ चा धर्माबाद येथे उत्साहपूर्ण वातावरणात शानदार समारोप झाला. ६ दिवस रंगलेल्या चुरशीच्या सामन्यांनंतर झालेल्या अंतिम लढतीत मुंबई संघाने पुणे संघावर ३-१ अशी मात करत विजेतेपद पटकावले.



स्पर्धेच्या अंतिम दिवसाची सुरुवात सकाळी ७:३० वाजता तृतीय क्रमांकाच्या सामन्याने झाली. पालघर आणि कोल्हापूर संघांमध्ये झालेल्या या सामन्यात पालघर संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तिसरे स्थान पटकाविले. प्रेक्षकांनी मोठ्या उत्साहात सामन्यांचा आनंद घेतला.

यानंतर सकाळी १०:३० वाजता झालेल्या ग्रँड फिनालेमध्ये पुणे आणि मुंबई संघ आमनेसामने भिडले. दोन्ही संघांनी आक्रमक खेळाचे प्रदर्शन केले; मात्र मुंबई संघाने अचूक समन्वय व प्रभावी गोलच्या जोरावर सामना ३-१ ने जिंकत विजेतेपदावर आपले नाव कोरले.

या अंतिम सोहळ्यास मान्यवर म्हणून सौ स्वाती दाभाडे (SDM, धर्माबाद), दशरथ पाटील (DYSP धर्माबाद), सौ सुरेखा स्वामी (तहसीलदार, धर्माबाद) आणि नागेश लखमावाड (वैद्यकीय अधिकारी, परभणी) उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी स्पर्धेच्या उत्कृष्ट आयोजनाचे व खेळाडूंना दिलेल्या सुविधांचे कौतुक केले.

मान्यवरांनी RKSVM संस्थेच्या कार्याचे विशेष अभिनंदन करत शिक्षणासोबत क्रीडा संस्कार देण्याच्या उपक्रमाला आदर्शवत म्हटले. अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील युवकांमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि संघभावना विकसित होते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी शाळेचे व्यवस्थापकीय संचालक श्री सुबोध काकानी यांनी धर्माबाद शहरातील विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती निर्माण करण्यासाठी भविष्यात अशा प्रकारचे सामने आयोजित करणार असल्याचे प्रतिपादन केले व ही संधी शाळेला दिल्याबद्दल WIFA चे कौतुक केले.

स्पर्धेचे नियोजन सुरळीत पार पडण्यासाठी WIFAचे वरिष्ठ पदाधिकारी - डॉ. किरण चौघुले (सचिव), सलीम परकोटे (कोषाध्यक्ष) आणि धनराज मोरे (रेफरी हेड) यांनी मार्गदर्शन केले.

अंतिम सामन्यानंतर पारितोषिक वितरणाचा भव्य कार्यक्रम राजाराम काकानी सहकार विद्या मंदिर येथे पार पडला. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या व यशस्वी संघांचा गौरव करण्यात आला.यावेळी उपस्थित पालकांनी आपल्या मनोगतातून स्पर्धेच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल आयोजक राजाराम काकानी सहकार विद्या मंदिर शाळेचे विशेष आभार मानले. विद्यार्थ्यांना सुरक्षित, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरण उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेचे कौतुक करण्यात आले. समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका सौ संध्या देशपांडे यांनी व प्राची ठाकूर, भक्ती भोसले, दिविजा हमद, जिवक पोवाडे या विद्यार्थ्यांनी केले तर आभार प्रदर्शन पार्थ भोसीकर या विद्यार्थ्याने मांडले. चषक घेताना सर्व जेथे उपजेते अत्यंत उत्साह व जल्लोष करत सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण केले कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम ने झाली.



## नवगण राजुरीच्या गजानन विद्यालयात शिवजयंती साजरी

नवगण राजुरी ।प्रतिनिधी

येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती साजरी करण्यात आली.गुरुवार दि.१९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती निमित्त छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य प्रशांत पवळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपमुख्याध्यापक शिंदे एस. एस. पर्यवेक्षक दगडे व्ही. एन, शेख एस. वाय, भोसले बी. एस, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी, उपस्थित होते.

# शिवजयंती उत्साहात साजरी

अंबाजोगाई(प्रतिनिधी)

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अंबाजोगाई शहरात उत्साहात साजरी करण्यात आली.जयंती निमित्ताने शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरातून निघालेल्या रॅलीत मोठ्या संख्येने युवक सहभागी झाले होते. नंतर पारंपारिक लोककला, पारंपारिक वाद्य या प्रकारांनी शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून स्वराज्याचा भगवा ध्वज फडकवून ध्वजारोहण करण्यात आले. जिजाऊ वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली.यावेळी शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष रणजित लोमटे,बीड जिल्हा राष्ट्रवादी



काँग्रेसचे अध्यक्ष (अजित पवार) राजेश्वर चव्हाण, माजी आमदार पृथ्वीराज साठे,संजय दौंड, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, डॉ.नरेंद्र काळे,अमर देशमुख, बबन लोमटे, राजेसाहेब देशमुख,ॲड.शोभा सुनिल लोमटे यांच्यासह सामाजिक,राजकीय पदाधिकारी,कार्यकर्ते व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंबाजोगाई शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकातून जयंती उत्सव समितीच्या वतीने भव्य मिरवणूक काढण्यात आली. या काढण्यात आलेल्या मिरवणुकीत घोडे,उंट,विविध ढोलपथक,हलगी पथक,शिवकालीन पारंपारिक दांडपट्टे पथक,वासुदेव,आराधी गोंधळी,वारकरी, बालकांच्या - वेशातील शिवबा, जिजाऊ आणि फटाक्यांची आतषबाजी शिवभक्तांचे लक्ष वेधून घेत होते.

# अनाथ-वृद्धाश्रम भेटीतून आदित्यच्या विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीवेचे धडे

### आदित्य औषधशास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची घाटसावळी येथे शैक्षणिक भेट

बीड ।प्रतिनिधी

आदित्य औषधशास्त्र महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब वृद्धाश्रम, घाटसावळी येथे भेट देत सामाजिक संवेदनशीलतेचा जिवंत अनुभव घेतला.५० विद्यार्थ्यांनी अनाथ-वृद्धाश्रम भेटीतून सामाजिक जाणीवेचे धडे मिळाले.

अभ्यासक्रमानुसार अनाथ/वृद्धाश्रम भेट देणे अनिवार्य असून, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, सार्वजनिक विकासाची भावना आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा निर्माण व्हावी हा या उपक्रमामागील उद्देश आहे. दि.१४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत झालेल्या




या भेटीत ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या जीवनप्रवासाची माहिती जाणून घेतली. तसेच कडधान्ये व फळांचे वाटप करून सामाजिक कर्तव्याची जाणीव प्रत्यक्ष कृतीतून व्यक्त केली.वृद्धाश्रमाचे संचालक व समाजसेवक चंद्रकांत फड सर यांनी समाजाशी नाळ जोडून काम करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. युवा पिढीने सामाजिक बांधिलकी जोपासली तरच समाज सुदृढ बनेल, असे मार्गदर्शन त्यांनी केले. डॉ. कुमार सुरवसे यांनी अनाथ व वृद्धांच्या समस्या, त्यांच्या जीवनातील संघर्ष आणि समाजाने त्यांच्याप्रती असलेली जबाबदारी यावर सखोल मार्गदर्शन केले.

या उपक्रमासाठी आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. सुरवसे यांच्या संकल्पनेतून,प्रा. मोराळे व प्रा. वाघमोडे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

समाजाशी नाळ जोडण्याचा संदेश

अनाथ व वृद्धाश्रम भेट ही केवळ अभ्यासक्रमाची औपचारिकता नसून, विद्यार्थ्यांमध्ये मानवतेचे मूल्य रुजवणारा उपक्रम आहे. युवा पिढीने समाजातील दुर्लक्षित घटकांकडे सहानुभूतीने पाहून त्यांच्या उन्नतीसाठी पुढाकार घेतला तरच सामाजिक विकासाला खरी गती मिळेल, असा संदेश या भेटीतून देण्यात आला.

## सौ सुमिता पांडे यांचे अल्पशा आजाराने निधन, सुमित पांडे यांना मातृशोक

बीड ।प्रतिनिधी

बीड येथील आदर्श नगर सांगली बँक मागे येथील रहिवासी सुमित पांडे यांच्या




मातोश्री सौ सुमिता प्रदीप पांडे यांचे वयाच्या ६२ वर्षी अल्पशा आजाराने दिनांक १९/२/२०२६ रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा आज दिनांक २०/२/२०२६ रोजी सकाळी १० वाजता आदर्श नगर येथून निघणार आहे. अंत्यविधी अमरधाम स्मशानभूमी मोंढा रोड येथे होणार आहे.त्यांचा पश्चात पती प्रदीप. २ मुले सुमित आणि विशाल मुलगी प्रीती सुना जावई नातवंडे असा परिवार आहे. पांडे कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांनी आदर्श व समाजप्रिय राजसत्तेला जन्म दिला - प्राचार्य डॉ नामदेव सानप

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांनी आदर्श व समाजप्रिय राजसत्तेला जन्म दिला. एका प्रेरणादायी युगाची निर्मिती केली. त्यामुळे 'मनासारखा राजा आणि राजा सारखं मन' अशी प्रतिमा छत्रपती शिवाजी महाराज यांची समाजमनात निर्माण झाली. असे मत प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांनी व्यक्त केले.

छत्रपती संभाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात डॉ.सानप हे बोलत होते. व्यासपीठावर प्रा. संतोष प्रधान प्रा डॉ प्रज्ञा किवंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. सानप म्हणाले की, हिंदवी स्वराज्याच्या माध्यमातून प्रजेच्या मनातील राज्याचे स्वप्न छत्रपती शिवाजी महाराजांनी साकार केले. छत्रपती शिवाजी महाराज कुशल प्रशासक व दृष्टी प्रधान राजा होते.आपल्या राज्यात महिला आणि परधर्मीयांचा त्यांनी सन्मान राखला. हिंदवी स्वराज्यातून राष्ट्रप्रेम आणि कर्तव्याची प्रेरणा मिळते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रति आजही समाजमनात आदरयुक्त दरारा कायम आहे.असे



ही डॉ सानप यांनी म्हटले.यावेळी प्रा.प्रधान म्हणाले की,छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार युवकांनी आत्मसात करण्याची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराजां च्या विविध विचारांना स्वातंत्र्योत्तर कालखंडात घटनात्मकरित्या स्विकार करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाही राजवटीत छत्रपतींच्या विचारांचा समावेश केला असे म्हटले.यावेळी डॉ. प्रज्ञा किवंडे यांनी समयोचित भाषण केले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची पूजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सुत्रसंचलन रोहन त्रिभुवन यांनी केले तर शेवटी प्रा. हर्षद वाघमारे यांनी आभार मानले.

## संविधान जागृतीसाठी राज्यव्यापी उपक्रमाला प्रारंभ

मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांच्या पुढाकाराने राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये संविधान विषयक जाणीव आणि मूल्यांची रुजवण करण्यासाठी राज्यव्यापी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती श्रीमती एम. एस. जावळकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य मा. ॲड. धर्मपाल प्रेमचंद यांच्या संकल्पनेतून 'राज्यस्तरीय संविधान जागृती स्पर्धा २०२५-२६' या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबाबत सखोल ज्ञान, कौशल्ये आणि सामाजिक न्यायाची जाणीव निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.या उपक्रमांतर्गत ऑनलाईन संविधान प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत असून तज्ज्ञ प्राध्यापकांकडून मार्गदर्शन दिले जात आहे. मुंबई विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, नागपूर येथील कायदे तज्ज्ञ तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शक विद्यार्थ्यांना संविधानातील मूलभूत अधिकार, कर्तव्ये, समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय यांविषयी सखोल मार्गदर्शन करीत आहेत.

विशेष सत्रात न्यायमूर्ती श्रीमती एम. एस. जावळकर (नागपूर खंडपीठ) यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत संविधानातील मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी प्रेरणादायी उत्तरे दिली. यावेळी माजी पोलिस महासंचालक प्रवीण दीक्षित तसेच समाजकल्याण क्षेत्रातील तज्ज्ञांनीही मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोबल अ. शुल यांनी केले. डॉ. जांबीर खानवडे, डॉ. साहिली सुरसे आणि डॉ. आरती तायडे यांची उपस्थिती लाभली. राज्यातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविल्याने उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.संविधान जागृती प्रसारमाध्यम स्पर्धा २०२५-२६ हा उपक्रम केवळ स्पर्धा नसून संविधान मूल्यांची जपणूक, जागरूक नागरिकत्वाची जाणीव आणि लोकशाही बळकटीसाठी प्रेरणादायी चळवळ ठरत आहे. राज्यातील युवक-युवतींमध्ये संविधानाबद्दल अभिमान आणि जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# तीर्थपुरी महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा आडमुठेपणा, आत्महत्याग्रस्त शेतकरी पत्नीची पैशांसाठी फरफट

### तहसीलदारांचे पत्र असूनही तीर्थपुरी शाखा देईना मुदतठेवीचे पैसे संतप्त महिला जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेणार.!

अंबड ।प्रतिनिधी

एकीकडे सरकार लाडकी बहीण योजना राबवून महिलांच्या सन्मानाच्या गप्पा मारत असताना दुसरीकडे महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या तीर्थपुरी शाखेने एका असहाय्य शेतकरी विधवेला आपल्याच हक्काच्या पैशांसाठी उंबरठे झिजवायला लावले आहे. पतीच्या आत्महत्येच्या जखमा अजून ओल्या असतानाच बँकेच्या आडमुठ्या भूमिकेमुळे लखमापुरी येथील द्वारका बाबुराव गोरे या महिलेला मानसिक जाचाला सामोरे जावे लागत आहे.

लखमापुरी ता.अंबड येथील रहिवासी बाबुराव गोरे यांनी दोन वर्षांपूर्वी कर्जबाजारीपणाला कंटाळून आपली जीवनयात्रा संपवली होती. शासनाकडून त्यांना १ लाख रुपयांची मदत मंजूर झाली होती. त्यापैकी ७० हजार रुपये हे २० डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतठेव म्हणून ठेवण्यात आले होते. दरम्यान, द्वारका गोरे या आजारी पडल्याने त्यांनी उपचारासाठी पैशांची मागणी केली होती. तेव्हा तहसीलदार अंबड यांच्या मध्यस्थीने ३५ हजार रुपये मिळाले. मात्र आता मुदत संपल्यानंतरही उर्वरित रकमेसाठी त्यांना बँकेचे उंबरठे झिजवावे लागत आहेत.


तहसीलदारांचे पत्रही बँकेने बासनात गुंडाळले.द्वारका गोरे यांनी सध्याच्या वैद्यकीय कारणास्तव ही रक्कम मिळावी म्हणून तहसीलदार अंबड यांचे लेखी पत्र बँकेला सादर केले आहे. मुदत संपलेली असताना आणि प्रशासनाचे स्पष्ट आदेश असतानाही तीर्थपुरी शाखेचे अधिकारी विविध कारणे सांगून पैसे देण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोप गोरे यांनी केला आहे. गेल्या काही दिवसांत त्यांनी बँकेच्या तीन चकरा मारल्या पण प्रत्येक वेळी त्यांना रिकाम्या हाती परतावे लागले.

बँकेची भूमिका अत्यंत असंवेदनशील आहे.पतीच्या निधनानंतर मी आधीच खचले आहे. त्यात आता हक्काच्या पैशांसाठी मला भिकाऱ्यासारखे वागवले जात आहे. जर बँकेने तातडीने पैसे दिले नाहीत तर मी जिल्हाधिकारी आणि ग्राहक आयोगाकडे दाद मागणार आहे असे द्वारका बाबुराव गोरे पीडित महिला लखमापुरी यांनी म्हटले आहे.बँकेच्या कार्यपद्धतीवर संताप,शासकीय मदतीचे पैसे असतानाही बँक प्रशासन एका हतबल महिलेला त्रास का देत आहे ? असा सवाल आता ग्रामस्थांमधून उपस्थित होत आहे. बँकेच्या या मनमानी कारभारामुळे सर्वसामान्य खातेदारांमध्ये भीतीचे वातावरण आहे.आता या प्रकरणात जिल्हाधिकारी काय पाऊल उचलतात आणि या महिलेला न्याय मिळतो का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## श्री ईच्छापुर्ती गणेश मंदिर व श्री तुळजाभवानी मंदिरात १४ या वर्धापन दिन सोहळ्या निमित्त भक्तीमय कार्यक्रम..

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील श्री गणपती मंदिरात भवानी मंदिराव १४ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध भक्तीमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे तरी तीर्थक्षेत्र खडकेश्वर नगरीतील व परिसरातील सर्व भाविक भक्तांना कळविण्यात आनंद होतो की, तीर्थक्षेत्र खडकेश्वर नगरीत श्री ईच्छापुर्ती गणेश मंदिर व श्री तुळजाभवानी मंदिर या दोन मंदिराचा १४ वा वर्धापन दिन सोहळा संपन्न होत आहे. १४ व्या वर्धापन दिनानिमित्य खालील कार्यक्रम ठेवण्यात आलेले आहेत. तरी सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमात सहभागी होवून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, ही नम्र विनंती.भव्य कीर्तन सोहळाफाल्गुन शु.३ शुक्रवार,





दि.२०.२.२०२६ रोजी रात्री ८ वा.ह.भ.प.प्रकाश महाराज साठे बीड (झी टॉकीज फेम)फाल्गुन शु.४ शनिवार, दि.२१.०२.२०२६ रोजी रात्री ८ वा. ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली कोठुळे, आळंदी झी टॉकीज फेम मृदंगाचार्य: पांडूरंग काळे, रामेश्वर आवळे, चंद्रकांत पांचाळ गायक माधव महाराज पांचाळ मारजवाडीकर, विष्णु पाटील तांदळीकर, निवृत्ती महाराज कुलकर्णी, शिवा वंटगिरे, गजानन पांचाळ, मारोती पाटील कदम, बालाजी पांचाळ, प्रशांत बनबरे भजनी मंडळ खडकेश्वर भजनी मंडळ, रावी, लखमापूर, वळंकी, कलंबर, भासवाडी, मारजवाडी, डोरनाळी, हाळणी,रावणकोळा, बामणी, गोजेगाव, कोटग्याळ, ईटग्याळ,फाल्गुन शु.५ रविवार, दि.२२.०२.२०२६ स. ११ ते ५ महाप्रसाद होणार आहे असे आव्हान श्री ईच्छापुर्ती गणेश मंदिर व तुळजाभवानी मंदिर संस्थानचे पदाधिकारी व पुजारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले आहे.

# शिवजयंतीचा उत्साह; शालेय विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने वेधले सर्वांचे लक्ष

जाफराबाद ।प्रतिनिधी

जाफराबाद तालुक्यातील बोरगाव बुद्रुक येथे अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज बोरगाव बुद्रुक येथे अतिशय उत्साहपूर्ण आणि आगळ्यावेगळ्या वातावरणात शिवजयंती साजरी करण्यात आली. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव बु येथील विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करून काढलेल्या प्रभात फेरीने गावातील वातावरण शिवमय झाले होते.



सकाळी गावातील मुख्य मार्गावरून काढण्यात आलेल्या या प्रभात फेरीत शाळेतील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मुलांनी फेटे आणि मुलींनी नऊवारी साड्या असा 'मराठमोळा लुक' परिधान केला होता. या चिमुकल्या मावळ्यांच्या हातात डोलणारी भगवी निशाणे आणि लेझीमचा ताल पाहून ग्रामस्थ भारावून गेले होते.या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे विद्यार्थ्यांचे लेझीम पथक. ढोल-ताशांच्या गजरात आणि लेझीमच्या कडकडाटात विद्यार्थ्यांनी विविध कलाएशप्रकार सादर केले. विद्यार्थ्यांच्या या कलेचे आणि ऊर्जेचे कौतुक करण्यासाठी संपूर्ण गाव रस्त्यावर उतरले होते. जय भवानी, जय शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.या कार्यक्रमासाठी शाळेचे शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष,पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिशय शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यामुळे बोरगाव बु येथे शिवजयंतीचा आनंद द्विगुणित झाला.

काळे सरांचे पालकांना भावनिक आवाहन....

या सोहळ्यादरम्यान उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना प्रल्हाद काळे सरांनी एक अत्यंत महत्त्वाचे आणि भावनिक आवाहन केले. ते म्हणाले की, आपल्या जिल्हा परिषद शाळेतील मुले खूप अभ्यासू आणि गुणवंत आहेत. ग्रामीण भागातील ही ज्ञानाची मंदिरे म्हणजेच जिल्हा परिषद शाळा वाचवणे ही काळाची गरज आहे. आपली शाळा टिकवण्यासाठी आणि मुलांच्या उज्वल भविष्यासाठी आपल्या लेकरांना जिल्हा परिषद शाळेतच प्रवेश द्यावा. असे भावनिक आवाहन यावेळी उपस्थित पालकांना केले.

# भार्डी येथे जिल्हा परिषद शाळेत शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी

घुंगर्डे हादगाव ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भार्डी येथे छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६ वी जयंती अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तीभावाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री.राजेश डोईफोडे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून गावचे सरपंच श्री.नवनाथ डोईफोडे,उपसरपंच श्री.निसार सय्यद,ग्रामपंचायत सदस्य श्री. राधाकिसन काळे तसेच पोलीस पाटील श्री.प्रल्हाद सांगडे हे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विधिवत पूजन करण्यात आले.त्यानंतर विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथांवर आधारित भाषणे देशभक्तीपर गीते व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमात



मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य,धैर्य, नेतृत्वगुण आणि स्वाभिमानाचा आदर्श घेऊन जीवनात यशस्वी होण्याचे आवाहन केले.

यावेळी विठ्ठल बगाटे, भागवतअण्णा घेर,रशीद पठाण,रामभाऊ डोईफोडे, मच्छिंद्र साबळे,महादेव धुमाळ, शेषराव खनसे,जनार्धन वाहुळे, गंगाधर वाहुळे,अर्जुन नखाते, अर्जुन मैंद तसेच आप्पासाहेब उगले यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमेरिकेसोबतची ट्रेड डील म्हणजे भारतीय शेतकरी, सामान्य जनतेवर थेट हल्ला!–अजय बनकर

जाफराबाद ।प्रतिनिधी

देशाचा शेतकरी आधीच महागाई, कर्जबाजारीपणा आणि वाढत्या उत्पादन खर्चाच्या प्रचंड ओझ्याखाली दबलेला आहे. बियाणे, खते, औषधे, डिझेल, वीज आणि मजुरीचे दर सातत्याने वाढत आहेत. मात्र शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही. अशा कठीण परिस्थितीत सरकारने शेतकऱ्यांच्या हितांऐवजी परदेशी कंपन्यांच्या फायद्यासाठी निर्णय घेणे अत्यंत चिंताजनक आहे. अमेरिकेसोबत केली जाणारी ही ट्रेड डील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांसाठी विकासाची संधी नसून, संकटाची घंटा आहे.



ही डील लागू झाल्यास परदेशातून स्वस्त शेतीमाल भारतात येईल. त्यामुळे देशांतर्गत बाजारात भारतीय शेतमालाचे दर घसरणार असून त्याचा थेट फटका आपल्या कष्टकरी शेतकऱ्यांना तसेच सामान्य जनतेवर बसणार आहे.भारतीय शेती हा केवळ व्यवसाय नसून, कोट्यवधी कुटुंबांची जीवनरेखा आहे. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे; त्याच्या घामातूनच देशाची भूक भागते. आज जर शेतकऱ्यांचे अस्तित्व धोक्यात आले, तर देशाची अन्नसुरक्षाही धोक्यात येईल.

ही ट्रेड डील नाही, तर शेतकऱ्यांच्या कष्टांवर आणि स्वाभिमानावर घाला आहे. भारताचा शेतकरी विकाऊ नाही! तो स्वाभिमानी आहे, संघर्षशील आहे आणि देशाचा मजबूत आधारस्तंभ आहे.शेतकऱ्यांच्या हितांशी तडजोड करणारी कोणतीही धोरणे आम्हाला मान्य नाहीत. सरकारने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवावे, किमान आधारभूत किमतीची (चडझ) हमी द्यावी, स्थानिक उत्पादनाचे संरक्षण करावे आणि परकीय दबावापुढे झुकू नये.

शेतकरी मजबूत तरच देश मजबूत!

शेतकरी वाचला तरच भारत वाचेल!या संदर्भात जाफराबाद तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष अजय बनकर यांनी आपले मत व्यक्त केले आहे. यावेळी तहसीलदार साहेब यांना निवेदन देण्यासाठी उपस्थित अजय बनकर, मुरलीधर भोपळे, रघुनाथ पाचे,भरत अंभोरे, सुनील गाडेकर, भगवान भोपळे, अँड.एस.व्ही.सगट, भास्कर ढाले , राहुल हिवाळे, शेख माजेद, पंकज कायस्थ व पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शहागडमधील ऐतिहासिक पहिला आमरण उपोषण तिसऱ्या दिवशी मागे

## उच्चस्तरीय चौकशीच्या आश्वासनानंतर आंदोलकांची माघार

शहागड ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील शहागड येथे विविध मागण्यांसाठी सुरू असलेले ऐतिहासिक पहिले आमरण उपोषण बुधवारी तिसऱ्या दिवशी मागे घेण्यात आले.पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी ज्योती कडदिवे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन मागण्यांवर चौकशीचे ठोस आश्वासन दिल्यानंतर उपोषणकर्ते गणेश शिंदे,इमरान पठाण व संतोष हरेर यांनी उपोषण सोडले.प्रशासनाने या प्रकरणाची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले असून संबंधित अधिकाऱ्यांकडून सखोल तपास होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



गटविकास अधिकाऱ्यांच्या हस्ते सरबत, प्रशासनाचा तोडगा

उपोषण सोडवताना गटविकास अधिकारी ज्योती कडदिवे यांच्या हस्ते आंदोलकांना सरबत देण्यात आले.यावेळी सहाय्यक विस्ताराधिकारी समीर जाधव, विस्तार अधिकारी ए.ए. चव्हाण,व्ही.बी.बनाटे,एम.आर. वैष्णव यांनीही उपोषण सोडवण्यासाठी पुढाकार घेतला.शहागड पोलीस चौकीचे पोलीस जमादार फुलचंद हजारे व रामदास केंद्रे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली वैद्यकीय पथकाची तपासणीउपोषणाच्या तिसऱ्या दिवशी आंदोलकांची प्रकृती खालावली होती.वैद्यकीय अधिकारी डॉ. वैष्णवी नरवाडे,डॉ.निर्गुण देवकर,समुदाय वैद्यकीय अधिकारी राजेंद्र गायके यांच्या पथकाने तपासणी केली असता उपोषणकर्त्यांचा रक्तदाब ११०/७० पर्यंत कमी झाल्याचे तसेच साखर कमी झाल्याचे आढळून आले.उपोषणकर्त्यास उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय अंबड येथे दाखल केले होते.१०२ रुग्णवाहिकेचे भारत वाघुंबरे,क्लार्क विपुल सोनटक्के,जे.आर.माने,आरोग्य सहायिका एस.आर.हारके, सहाय्यक आर.ए.ससाणे व बाळासाहेब यांनी वैद्यकीय सेवा पुरवली.

राजकीय पाठपुरावा सर्वपक्षीय उपस्थिती

या प्रकरणी भारतीय जनता पार्टीचे विधानसभा प्रमुख सतीश घाटगे यांनी प्रशासनाला सूचना दिल्या तर खासदार संजय जाधव यांनीही पाठपुरावा केला होता.उपोषण सुटताना शिवसेना विभाग प्रमुख राजेश राऊत,राष्ट्रवादी गटनेते इलियास कुरेशी,युवा भाजप तालुकाध्यक्ष शिवाजी मोरे,ग्रामपंचायत सदस्य बप्पातात्या खराद,रितेश परदेशी,नजीर शहा,जुनेद तांबोळी,चंद्रकांत शिंदे,वंचितचे उपाध्यक्ष हरिभाऊ काळे, पोलीस पाटील श्रीकांत शिंदे यांच्यासह विविध राजकीय पदाधिकारी,सामाजिक कार्यकर्ते, युवा संघर्ष समितीचे सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहागडच्या प्रशासनावर आता चौकशीची कसोटी

शहागडमधील या ऐतिहासिक आमरण उपोषणामुळे ग्रामपंचायत कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून उच्चस्तरीय चौकशी समितीचा अहवाल गावाच्या राजकीय व प्रशासकीय वर्तुळात मोठा परिणाम घडवू शकतो अशी चर्चा सुरू आहे.

# वाटूर येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

## प्रभात फेरी,सांस्कृतिक कार्यक्रम व जनजागृती उपक्रमांनी परिसर दुमदुमला

परतूर ।प्रतिनिधी

परतूर तालुक्यातील वाटूर येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. सकाळी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जिल्हा परिषद शाळा साऊ एकल महिला समिती जालना, आधार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व आझाद बहुउद्देशीय सेवाभावी संस्था वाटूर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रभात फेरी व सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगला उत्सव कार्यक्रमाची सुरुवात ढोल-ताशांच्या गजरात प्रभात फेरीने झाली.यावेळी शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित घोषवाक्ये प्रेरणादायी संदेश व देशभक्तीपर गीते सादर करण्यात आली. विद्यार्थ्यांनी पोवाडे, भाषणे, नाट्यछटा व देशभक्तीपर गीतांद्वारे शिवरायांचा पराक्रम, स्वराज्याची संकल्पना व लोककल्याणाची विचारधारा प्रभावीपणे सादर केली. एकल महिलांसाठी जनजागृती व शिबिरे या कार्यक्रमाच्या निमित्ताने एकल



महिलांसाठी विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच आरोग्य शिबीर व आवश्यक कागदपत्र शिबीरांचे नियोजन करण्यात आले ज्यामुळे महिलांमध्ये शासन योजनांबाबत जागरूकता वाढली.शिवरायांच्या विचारांचा तरुणांना संदेश

प्रमुख पाहुण्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, नेतृत्वगुण,धर्मनिरपेक्षता व लोकहिताच्या कार्यावर प्रकाश टाकत तरुण पिढीने शिवरायांचा आदर्श आत्मसात करून समाजहितासाठी कार्य करावे, असे आवाहन केले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी स्वराज्याच्या विचारांचे आचरण करण्याची शपथ घेतली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एकनाथ राऊत अध्यक्ष,बाल कल्याण समिती जालना, केंद्रप्रमुख संपत आढे, मुख्याध्यापक एस.ए.पाटोळे, श्रीमती डुकरे,एस.ए.पाईकराव, अध्यक्ष रवि माने,रतन सिरसाट, प्रकाश वाघमारे,तय्यब पठाण, एजाज देशमुख,सुरेश बच्छीरे, राजेश राऊत,मीरा मोरे,सुनीता मोरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तळणी येथे शिवजयंतीनिमित्त मोफत नेत्रतपासणी शिबिर; ४०० हून अधिक रुग्णांची तपासणी

तळणी ।वार्ताहर

मंठा तालुक्यातील तळणी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या शिवजयंतीनिमित्त तसेच कुलस्वामिनी मंगल कार्यालय व मातोश्री लॉन्सच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त मोफत नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. त्यानंतर सरपंच गौतम सदावर्ते, गजानन देशमुख, माऊली सरकटे, भाजपाचे तालुका उपाध्यक्ष शरद पाटील, नितीन सरकटे, दत्तराव सरकटे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते नेत्रतपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

या शिबिरात तज्ञ नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रदीप मधुकर अंभोरे यांनी तळणीसह परिसरातील ४०० हून अधिक रुग्णांची नेत्रतपासणी करून मार्गदर्शन केले. चष्म्याचा नंबर, मोतीबिंदू, काचबिंदू, डोळ्यांच्या पडद्याचे आजार, तिरळेपणा, डोळ्यांचा कोरडेपणा, पापणीचे आजार आदी विविध समस्यांचे निदान करून आवश्यक ते उपचार करण्यात आले. जवळचे व लांबचे कमी दिसणाऱ्या रुग्णांना मोफत चष्म्यांचे वाटपही करण्यात आले.



या शिबिराचे आयोजन कुलस्वामिनी मंगल कार्यालयाचे संचालक तथा सेवा निवृत्त सहायक वन संरक्षक अधिकारी विजय जोशी तळणीकर, सर्जेराव सरकटे व नारायण सरकटे यांनी केले होते. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना तज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी व मार्गदर्शनाची संधी उपलब्ध झाली असून, उपस्थितांनी आयोजकांचे आभार मानले.सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत मोबाईल, संगणक व दूरदर्शनच्या अतिवापरामुळे डोळ्यांवरील ताण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अनेकजण किरकोळ त्रासाकडे दुर्लक्ष करतात आणि त्यामुळे पुढे गंभीर समस्या उद्भवू शकतात. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतूनच सामाजिक बांधिलकी जपत हे मोफत नेत्रतपासणी शिबिर आयोजित केले.विजय जोशी तळणीकर (सेवानिवृत्त सहाय्यक वनसंरक्षण अधिकारी)



# छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची वर्तमान काळात नितांत गरज–डॉ.एकनाथ शिंदे

जालना ।प्रतिनिधी

अंकुशराव टोपे महाविद्यालयात शिवजयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात प्रमुख वक्ते डॉ.एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या चारशे वर्षांपूर्वीच्या विचारांची आजच्या तरुण पिढीसाठी अत्यंत गरज असल्याचे ठाम प्रतिपादन केले.आधुनिकतेच्या वेगवान युगात शिवाजी महाराजांनी अंगीकारलेले ध्येय आत्मविश्वास विवेकबुद्धी,शिस्त वेळेचे नियोजन, स्त्री सन्मान, नैतिकता, नेतृत्वगुण, संघटन कौशल्य आणि अपयशातून शिकण्याची सकारात्मक वृत्ती हे गुण तरुणांच्या व्यक्तिमत्व घडणीत दिशादर्शक ठरतात, असे त्यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. दादासाहेब गजहंस होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरवपूर्ण उजाळा देत, विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे, पर्यवेक्षक प्रा. रामप्रसाद भालेकर तसेच कार्यालयीन अधीक्षक सुरेश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. बद्रीनाथ शिंदे यांनी केले. यावेळी डॉ. पंडित राणमाळ, डॉ. कार्तिक गावंडे, डॉ. रामनाथ सांगोळे, डॉ. रामदास वैद्य, डॉ. सीमा निकाळजे, डॉ. अविनाश भालेराव, डॉ. मसूद अन्सारी, डॉ. शंकर तिकांडे तसेच प्राध्यापक वृंद, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अ‍ॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# केकतसारणी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती पारंपरिक पद्धतीने साजरी,रमेशराव आडसकर यांच्या हस्ते पुजन

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील केकत सारणी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती यंदा अत्यंत पारंपारिक व उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. गावकऱ्यांनी एकत्र येत कोणत्याही प्रकारचा कर्कश आवाज करणारा डॉल्बी न लावता ढोल- ताशे,लेझीम,टिपरे आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढून एक आदर्श निर्माण केला

सकाळी लवकर ग्रामस्थांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन रमेशराव आडसकर यांच्या हस्ते करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.त्यानंतर सजवलेल्या बैलगाडीतून महाराजांची प्रतिमा ठेवून गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक पोशाख परिधान केलेले युवक, लेझीम खेळणाऱ्या महिला व मुली,तसेच शिवकालीन वेशभूषेत सहभागी झालेले लहान मुले हे मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले. जय भवानी,जय शिवाजी च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

यावेळी आंबा साखर कारखान्याचे चेअरमन श्री.रमेशरावजी आडकर साहेब व ऋषीकेश भैया आडसकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यांनी उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेतील कार्याचा उल्लेख करून युवकांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घ्यावा असे आवाहन केले.सामाजिक ऐक्य, शिस्त आणि पर्यावरण पूरक सण साजरा करण्याचा संदेश त्यांनी दिला.कार्यक्रमात गावातील सर्व लहान मुले,महिला,पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.तरुणांनी नियोजन, शिस्त व व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडत जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.विशेष म्हणजे,ध्वनीप्रदूषण टाळत पारंपरिक पद्धतीने सण साजरा करण्याचा घेतलेला निर्णय सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरला.

संपूर्ण गावाने एकजुटीने आणि उत्साहाने जयंती साजरी करून समाजा पुढे एक आगळावेगळा आदर्श निर्माण केला. केकतसारणी येथील ग्रामस्थांनी परंपरा जपत सुसंस्कृत आणिपर्यावरण पूरक पद्धतीने जयंती साजरी करून खऱ्या अर्थाने शिवरायांच्या विचारांना अभिवादन केले.यावेळी पंडितराव सावंत,बालासाहेब सपकाळ,बापुराव फुके, चंद्रकांत कोरडे,शरद गिराम यांच्या सह गावातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जाफराबाद येथे बांधकाम कामगार बांधवांचा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

जाफराबाद ।प्रतिनिधी

धडक कामगार युनियन महासंघाच्या वतीने जाफराबाद तालुक्यातील बांधकाम कामगार बांधवांचा भव्य सन्मान सोहळा दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १२ वाजता नगर पंचायत कार्यालय समोर, जाफराबाद येथे उत्साहात पार पडला.या कार्यक्रमाला विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रमुख पाहुणे म्हणून दीपक पाटील वाकडे (नगरअध्यक्ष जाफराबाद) तसेच शेख रऊफ चेरमन उपनगराध्यक्ष उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धडक कामगार युनियन महासंघाचे पद अधिकारी उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात बांधकाम कामगारांच्या हक्कांसाठी संघटना सदैव कटिबद्ध असल्याचे सांगितले. कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा, यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.



यावेळी तालुक्यातील सर्व पत्रकार बंधू तसेच राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात कामगार चे अध्यक्ष सुनील हिवाळे,कामगार चे उप अध्यक्ष निसार शहा, विजय लोखंडे, सुरेश काकडे, शेख नदिम, रईस पठाण, नासेर पठाण, यासीन पठाण, सय्यद फहीम आदी पदाधिकाऱ्यांनी आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली.

सन्मान सोहळ्यात अनेक बांधकाम कामगारांना शाल, श्रीफळ व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन करण्यात आले आणि कामगार बांधवांच्या हक्कांसाठी एकजूट राहण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.या कार्यक्रमामुळे जाफराबाद तालुक्यातील कामगारांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून संघटनेच्या कार्याला अधिक बळ मिळाले आहे.

# केज येथील चाईल्ड प्रायमरी स्कूलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

केज/प्रतिनिधी

केजशहरातील नामांकित शैक्षणिक संस्था चाईल्ड प्रायमरी स्कूल,केज येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावाने साजरी करण्यात आली.शाळेच्या प्रांगणात शिवप्रतिमेचे पूजन करूनकार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी विद्यार्थी,शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या

अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक शरद गिराम सर हे होते. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की,छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून आदर्श शासन प्रणाली उभी केली. त्यांच्या शौर्य,दूरदृष्टी, शिस्त आणि संघटन कौशल्याचा आदर्श विद्यार्थ्यांनी घ्यावा. शिवाजी महाराजांचे जीवन हे केवळ इतिहास नसून ते प्रेरणादायी मार्गदर्शक आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने प्रामाणिक पणा,धैर्य आणि देशभक्ती ही मूल्ये आपल्या जीवनात रुजवावीत, असे त्यांनी सांगितले.तसेच शिक्षणा सोबतच संस्कारांचे महत्त्व ही अधोरेखित केले.शाळेच्या सचिव पूजा गिराम यांनी प्रास्ताविक करताना शिवाजी महाराजांच्या बालपणापासून ते स्वराज्य स्थापनेपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडला.जिजाऊंच्या संस्कारांमुळेच शिवराय घडले,असे नमूद करत त्यांनी पालकांनीही मुलांमध्ये चांगले संस्कार रुजवावेत,असे आवाहन केले.शिवाजी महाराजांच्या प्रशासन कौशल्य,स्त्रीसन्मान व धर्मनिरपेक्षतेच्या विचारांचा उल्लेख करून त्यांनी विद्यार्थ्यांना इतिहासातून प्रेरणा घेण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साखरे सर यांनी प्रभावीपणे केले.त्यांनी शिवजयंतीचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करत विविध कार्यक्रमांची माहिती प्रेक्षकांना दिली. विद्यार्थ्यांच्या सादरी करणांना जोड देत त्यांनी कार्यक्रमात उत्साह निर्माण केला.यावेळी विद्यार्थ्यांनी शिवकालीन वेशभूषा परिधान करून आकर्षक सादरीकरण केले.काही विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज,जिजाऊ, मावळे यांची वेशभूषा साकारली होती.




विद्यार्थ्यांनी शिवचरित्रा वर आधारित भाषणे सादर केली तसेच देशभक्तीपर गीतांनी वातावरण भारावून गेले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तपसे,पुरी, राऊत,मुसळे,चटप व भंडारे या शिक्षक व कर्मचारी वर्गाने विशेष परिश्रम घेतले.शेवटी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.या उत्साहपूर्ण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासा बद्दल अभिमान व प्रेरणा निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# आ.नारायण कुचे यांच्या विशेष प्रयत्नातून अंबड बस स्थानकात नवीन पोलीस चौकी

## महिलांसह विद्यार्थिनींच्या सुरक्षेला मोठा दिलासा

अंबड ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील महिलांच्या तसेच शालेय विद्यार्थिनींच्या सुरक्षेला प्राधान्य देत आमदार श्री.नारायण कुचे यांच्या सातत्यपूर्ण विशेष प्रयत्नातून अंबड बस स्थानक येथे नवीन पोलीस चौकीस मंजुरी मिळाली आहे. हा निर्णय अंबड शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आणि अभिमानास्पद मानला जात आहे.अंबड बस स्थानक परिसरात दररोज हजारो प्रवासी,महिला,विद्यार्थिनी तसेच सामान्य नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून येथे पोलीस चौकीची दीर्घकाळापासून गरज होती. आता या चौकीस मंजुरी मिळाल्याने महिलांना अधिक सुरक्षित वातावरण तर विद्यार्थिनींना प्रवास करताना आत्मविश्वास आणि संरक्षणाची हमी मिळणार आहे.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण पाऊल

नवीन पोलीस चौकीमुळे बस स्थानक परिसरात होणाऱ्या गैरप्रकारांना आळा बसेल, गुन्हेगारी घटनांवर नियंत्रण मिळेल आणि तातडीची पोलिस मदत उपलब्ध होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे. महिलांच्या सन्मान सुरक्षितता आणि सबलीकरणाच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत मोलाचा आणि दूरदर्शी असल्याचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.आ.नारायण कुचे यांचे अभिनंदन या



महत्त्वपूर्ण निर्णयासाठी आमदार श्री. नारायण कुचे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात येत आहेत. अंबड तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सुरक्षित वातावरण निर्मितीसाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी यापूर्वीही विविध उपक्रमांतून सिद्ध केले आहे

# 'शेतकरी शिक्षण संस्था' असे नाव दिले-माजी आ.भीमराव धोंडे

आष्टी - (राजेंद्र लाड) शिवजयंतीनिमित्त आयोजित मराठवाड्यातील सर्वात मोठ्या डॉ. स्वामीनाथन कृषी प्रदर्शन चे उद्घाटन संत-महंतांच्या आशीर्वादाने आणि मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले. सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त अश्वारूढ पुतळ्याचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रवेशद्वारावर नारळ वाढवून व फित कापून औपचारिक उद्घाटन करण्यात येवून महादेव मूर्तीचे पूजन व नारळ वाढवून मान्यवरांचे व्यासपिठावर आगमन झाले. व्यासपिठावर स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार भीमराव धोंडे होते. प्रारंभी अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी संदिप माने यांच्या मार्गदर्शनाखाली स्वागतगीत व राज्यगीत सादर केले. स्व. अजित दादा पवार यांना दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी निमंत्रक सौ. दमयंतीताई धोंडे, अजय दादा धोंडे, अभयराजे धोंडे, राजू काका धोंडे व प्राचार्य डॉ. श्रीराम आरसूळ यांनी अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

या प्रसंगी माजी आ. भीमराव धोंडे, माजी आ. बाळासाहेब आजबे, माजी आ. जनार्दन तात्या तुपे, मा. शिक्षण सभापती नियामत बेग, महंत विठ्ठल महाराज गहिनाथगडकर, ह.भ.प. रामकृष्ण रंधवे बापू, ह.भ.प. आदिनाथ महाराज आंधळे, ह.भ.प. विष्णु महाराज लिंबोडीकर, ह.भ.प. बालाजी महाराज, ह.भ.प. शिंदे महाराज, ह.भ.प. दिनकर महाराज तांदळे, कृषी आयुक्त सुनीलदादा चव्हाण, सुशीलाताई मोराळे, डॉ. शिवाजी राऊत, सौ. दमयंतीताई धोंडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी साळवे, उपविभागीय कृषी अधिकारी उद्धव गर्जे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, धैर्यशील थोरवे, रामराव खेडकर, लालाभाऊ कुमकर, पांडुरंग नागरगोजे, अशोक साळवे, काकासाहेब शिंदे, हरिभाऊ जंजिरे, बाबूभैय्या गर्जे, दिनकर महाराज तांदळे, सुदामकाका झिंजुर्के, शिवाजी सुरवसे, बबनअण्णा झांबरे, बबन औटे, ॲड. रत्नदीप निकाळजे, उपसभापती नामदेव धोंडे, अण्णासाहेब भोसले, युवा नेते अजय धोंडे, अभय धोंडे, चेअरमन राजेंद्र धोंडे, भाऊसाहेब घुले, प्राचार्य डॉ. श्रीराम आरसुळ, अंकुश मुंडे, बाबासाहेब शिंदे, नवनाथ सानप, भाऊसाहेब भराडे, सतीशमामा झगडे, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे, उत्तम बोडखे, इंजि. बाळासाहेब भुकन, दिलीप मस्के फौजी, अजय वाबळे, रोहित गांगर्डे, संतोष म्हत्रे, शाखा व्यवस्थापक शाही साहेब, सदा पाटील दिंडे,





माजी सरपंच संतोषभैय्या चव्हाण, पांडुरंग गावडे, संजय चंदनशिव, डॉ. डी. बी. राऊत, प्राचार्य संजय नालकोल, संभाजी दहातोंडे, बाबा ससाने, गौतम सावंत, कुंडलिक आस्वर, गौतम ससाने, रामनाथ बन, प्रा. बाळासाहेब धोंडे, हरी पाटील बोडखे, प्राचार्य सुरेश बोडखे, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, चेअरमन दादासाहेब हजारे, नानाभाऊ वाडेकर, बबनराव डोके, विठ्ठल लांडगे, सरपंच भरत जाधव, सुधीर जगताप, श्रीम. इंदूबाई गोल्हार, ॲड. मसरफ सर, संतोष सानप, महेश दादा निमोणकर, राजेंद्र लाड आदी सरपंच, उपसरपंच, कार्यकर्ते, नागरिक, शेतकरी, महिला, विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मराठवाड्यातील सर्वात मोठे डॉ. स्वामीनाथन कृषी प्रदर्शन आयोजित केल्याबद्दल माजी आ. भीमरावजी धोंडे साहेबांचा तसेच सौ. दमयंतीताई धोंडे, डॉ. अजय दादा धोंडे, अभयराजे धोंडे यांचा निमंत्रण म्हणून विशेष सन्मान संयोजकांच्या वतीने करण्यात आला.

प्राचार्य श्रीराम आरसूळ यांनी प्रास्ताविकात जीवनमान उंचावण्यासाठी आधुनिक व यांत्रिक शेती, प्रदूषण व कर्करोगासारख्या आजारांवरील जागरूकता, नवीन बियाणे संशोधन व शेतकरीभिमुख उपक्रमांची माहिती दिली. प्रदर्शनाचा सविस्तर आढावा मांडताना त्यांनी शेतकऱ्यांनी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा, असे आवाहन केले. एआयच्या माध्यमातून स्व. अजितदादा पवार यांच्या शुभेच्छाही घेण्यात आल्या.

ह.भ.प. रंधवे बापू महाराज म्हणाले, नेत्यांनी जगवायचे असते आणि साधू-संतांनी जागवायचे असते. या दोन्हींची सांगड घातली तर समाजसुधारणा निश्चित होते. त्यांनी परोपकार, पुण्यकर्म व समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. ह.भ.प. विठ्ठल महाराजांनी लोकप्रतिनिधींनी समाजसन्मुख राहून शेतकरी वर्गाला सर्वतोपरी सहकार्य करावे, असे सांगितले. ह.भ.प. आजिनाथ आंधळे महाराजांनी गावरान जनावरांचे महत्त्व, सेंद्रिय शेतीची गरज आणि प्रत्येकाने किमान एक गाय पाळावी, असे आवाहन केले. सेवानिवृत्त कृषी आयुक्त सुनिल चव्हाण यांनी शेतीत नियमित बदल करून आधुनिक अवजारे, संकरित बियाणे व गटशेतीचा अवलंब करावा, असे मत व्यक्त केले.

माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि नव्या तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांनी करावा, असे सांगितले. माजी आ. जनार्धन तुपे यांनी सामाजिक जाणीव असलेल्या नेतृत्वाची गरज अधोरेखित करत भीमराव धोंडे यांना दीर्घायुष्य लाभावे, अशी सदिच्छा व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणात माजी आ. भीमराव धोंडे म्हणाले, शेतकऱ्यांची जाण असल्यामुळे माझ्या संस्थेला शेतकरी शिक्षण संस्था असे नाव दिले. शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अनेक शासकीय योजनांतील त्रुटी शासनाने दूर कराव्यात. डॉ. स्वामीनाथन यांनी शेतकऱ्यांसाठी मोठे कार्य केले; त्यांच्या नावाने हे प्रदर्शन आयोजित केले आहे.

ते पुढे म्हणाले की, भगवान महाविद्यालयात लवकरच एआय तंत्रज्ञान सुरू करून त्याचा वापर शेतकऱ्यांच्या हितासाठी केला जाणार आहे. या प्रदर्शनासाठी शासनाचा एकही रुपया घेतलेला नाही व घेणारही नाही. लवकरच कॅन्सर हॉस्पिटल सुरू करण्याचा मानस असून त्यासाठी सव्वाशे एकर जमीन संस्थेला दिल्याची माहिती त्यांनी दिली. जूनपासून पॉलिटेक्निक कॉलेज व इतर महाविद्यालये सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. हार-जीत मी पाहत नाही; शेतकऱ्यांसाठी झगडत राहणार, अशी ठाम भूमिका त्यांनी व्यक्त केली. शिवजयंतीनिमित्त हे प्रदर्शन आयोजित करण्यामागे छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रजाहितदक्ष व शेतकरीहिताच्या विचारांना अभिवादन करण्याचा हेतू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तालुक्यातील महाराजांनी कीर्तनातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

कु. भक्ती गणेश गिरी हिने छत्रपती शिवाजी महाराजांवरील विचार मांडले. कृषी अधिकारी साबळे साहेब यांनी महाविस्तार ॲप डाउनलोड करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन निलेश दिवटे तसेच सागर देसाई पाटील व कु. सुजाता बनकर यांनी केले, तर उपसभापती पांडुरंग नागरगोजे यांनी आयोजकांच्या वतीने आभार मानले. राष्ट्रगीताने उद्घाटन सोहळ्याचा समारोप झाला. या भव्य कृषी प्रदर्शनास शेतकरी, महिला भगिनी, युवक, विद्यार्थी, कृषी विभागातील अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संतांच्या आशीर्वादाने आणि शेतकरीहिताच्या ध्यासाने भरलेले हे प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी नवी दिशा देणारे ठरले.

# पाटोदा शहरात शिवजन्मोत्सवाचा अभूतपूर्व उत्साह

पाटोदा (प्रतिनिधी):

'जय भवानी, जय शिवाजी' आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशा जयघोषाने आज पाटोदा शहर दुमदुमून गेले. सार्वजनिक शिवजयंती उत्सवाच्या निमित्ताने शहरात अत्यंत दिमाखदार आणि पारंपरिक पद्धतीने शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात आ.सुरेश धस उपस्थित होते व तालुक्यातील हजारो शिवप्रेमींनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.

अश्वरूढ पुतळ्यास आ.सुरेश धस यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूढ पुतळ्यास आ.सुरेश धस यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महाराजांच्या चरणी नतमस्तक होऊन विनम्र अभिवादन केले. पाटोदा शहर आणि तालुक्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या शिवभक्तांनी यावेळी मोठी गर्दी केली होती.

मिरवणुकीतील मुख्य आकर्षणे

यावर्षीची शिवजयंती रॅली ऐतिहासिक वारसा आणि आधुनिक उत्साहाचा संगम ठरली. मिरवणुकीत खालील बाबी विशेष आकर्षणाचे केंद्र होत्या:सिंहासनाधीश्वर पुतळा: हत्तीवरील अंबारीत विराजमान असलेला महाराजांचा पुतळा पाहण्यासाठी




नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.छत्रपती शंभुराजे यांचे दर्शन: जहाजावर उभा असलेला धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा या मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले.कलापथकांचा जल्लोष: ढोल-ताशांच्या गजरात 'भोलेनाथ पथक' व इतर कलापथकांनी सादर केलेल्या खेळांनी मिरवणुकीत रंगत आणली.पारंपारिक लवाझमा: मिरवणुकीत सामील झालेले उंट, घोडे आणि भगवे ध्वज हाती घेतलेले तरुण यामुळे संपूर्ण पाटोदा शहर शिवमय झाले होते.

शिवप्रेमींचा जनसागर

पाटोदा शहरातील मुख्य मार्गावरून काढण्यात आलेल्या या रॅलीमध्ये अबालवृद्धांसह महिलांचाही मोठा सहभाग होता. शिवभक्तांचा उत्साह आणि शिस्तबद्ध नियोजन यामुळे हा सोहळा अत्यंत शांततेत आणि चैतन्यमय वातावरणात पार पडला. उपस्थित सर्व समाज बांधवांना आणि शिवप्रेमींना यावेळी शिवजयंतीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# मानूर मध्ये नदीपात्रातून घेतले ट्रॅक्टर ताब्यात

मानूर /प्रतिनिधी ह्व

घरकुल लाभार्थ्यांच्या नावाखाली अवैध्य वाळू उपसा,वाहतूकीला आळा घालण्यासाठी शिरूर कासारचे तहसीलदार सुरेश घोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार गणेश दहिफळे यांनी सहकारी मंडळ अधिकारी निळकंठ सानप , तलाठी सुजान जाधव, महसुल कर्मचारी श्री. बर्डे समवेत मानूर शिवारातील थेट नदीपात्रात अवैध वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर ताब्यात घेतले.

शिरूर तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना वाळू वाटपाच्या आडून नदीपात्रात अवैध उत्खनन, अवैध वाळू वाहतुक करणार्या वाळू माफियांना दंडात्मक कारवाईने कायद्याची जानिव करून देण्यासाठी तहसीलदार सुरेश घोळवे यांनी सक्त आदेश दिले आहेत.

वरिष्ठांच्या आदेशानुसार बुधवारी (दि १७) रोऊसकाळी १०:३० घ्या दरम्यान ,मानूर शिवारातील मणकर्णा



नदी पात्रात वाळूचे अवैध उत्खनन करून ट्रॅक्टर भरत असताना नायब तहसीलदार गणेश दहिफळे, मंडळ अधिकारी निळकंठ सानप, तलाठी सुजान जाधव, महसूल कर्मचारी श्री बर्डे यांनी जायमोक्यावर ट्रॅक्टरवर कारवाई केली. दरम्यान, नदीपात्रात पथकाची चाहूल लागताच ट्रॅक्टर चालकाने धूम ठोकली. घटनास्थळाचा पंचनामा करून मुद्देमालासह ट्रॅक्टर शिरूर कासार तहसील कार्यालयाच्या प्रांगणात लावण्यात आला . महसूल अधिनियमांतर्गत ट्रॅक्टरवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

नायब तहसीलदार गणेश दहिफळे व त्यांच्या टिमने थेट नदीपात्रात जाऊन केलेल्या धाडसी कारवाईचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

तसेच मानूर परिसरातील अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यावर आळा बसेल असा विश्वास सर्वसामान्यतून व्यक्त केला जात आहे.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )


# आष्टी तालुक्यात शिवजयंती उत्साहात साजरी

### आ.सुरेश धस,मा.आ.भीमराव धोंडे,मा.आ.बाळासाहेब आजबे,उद्धव बापू दरेकर,सतिश आबा शिंदे यांच्यासह प्रमुख मान्यवरांची उपस्थिती

आ.सुरेश धस यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत १०१ फूट भगव्या ध्वजाचे दिमाखदार ध्वजारोहण

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी मतदारसंघात शिवजयंती मोठ्या उत्साहात, भक्तिभावाने व जल्लोषात साजरी करण्यात आली. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना आमदार सुरेश धस, माजी आ. भीमराव धोंडे, मा. आ. बाळासाहेब आजबे, उद्धव बापू दरेकर, सतिश आबा शिंदे यांच्यासह प्रमुख मान्यवरांनी उपस्थित राहून महाराजांना विनम्र अभिवादन केले. स्वराज्य, स्वाभिमान आणि न्यायनिष्ठ शासनव्यवस्थेचा संदेश देत समाजहितासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला.



आष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात १०१ फूट उंच भगव्या ध्वजाचे दिमाखदार ध्वजारोहण आमदार धस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराजांच्या पुतळ्याचे विधिवत पूजन व आरती करण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात आणि जय भवानी, जय शिवाजी च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. शिवजयंतीनिमित्त आयोजित विविध शालेय स्पर्धांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गरजू विद्यार्थिनींना सायकल वाटप करून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीस प्रोत्साहन देण्यात आले.

पांढरी (ता. आष्टी) येथे शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात सहभागी होत महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. जाती-पाती आणि धर्माच्या पलीकडे जाऊन समतेचे व न्यायाचे राज्य प्रस्थापित करणाऱ्या शिवरायांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. मुर्शदपूर (ता. आष्टी) येथील माऊली नगर परिसरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकातही अभिवादन करण्यात आले. स्वराज्य स्थापनेतील अद्वितीय शौर्य, शिस्तबद्ध लष्करी संघटन आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश अधोरेखित करण्यात आला.

सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांच्या शिवतीर्थ निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात महाराजांच्या पुतळ्यास आ. सुरेश धस व मान्यवरांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून मानाचा मुजरा करण्यात आला.

जळगाव व कडा कारखाना परिसर (ता. आष्टी) येथेही महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून त्यांच्या पराक्रम, दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराचे स्मरण करण्यात आले. मौजे कुसळंब (ता. पाटोदा) येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात उभारण्यात आलेल्या अश्वरूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ग्रामस्थांशी संवाद साधताना शिवरायांच्या लोककल्याणकारी विचारांचा गौरव करण्यात आला.

आष्टी येथील श्रीराम मंदिरात आयोजित शिवजयंती कार्यक्रमात महाराजांच्या मूर्तीचे विधिवत पूजन करण्यात आले. धर्म, न्याय आणि स्वाभिमानाच्या अधिष्ठानावर उभारलेले स्वराज्य आजही प्रेरणादायी असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. आष्टी शहरातील वडाचा गणपती, भाजी मंडई रोड परिसरात सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यात मानवंदना अर्पण करण्यात आली. शिवरायांनी अन्यायाविरुद्ध उभारलेला लढा आणि सर्वसमावेशक, लोकाभिमुख राज्यव्यवस्थेचा आदर्श पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. या सर्व कार्यक्रमांना मतदारसंघातील मान्यवर, नागरिक, युवक, महिला, पत्रकार बांधव व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साह, शिस्त आणि राष्ट्राभिमानाच्या वातावरणात शिवजयंती सोहळा संपन्न झाला.

# अंबड तालुक्यात घरकुलांची प्रगती ठप्प शासनमान्य वाळूअभावी गरीब लाभार्थ्यांचे हाल प्रशासनावर गंभीर प्रश्नचिन्ह

अंबड ।प्रतिनिधी

केंद्र व राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी घरकुल योजनांची अंबड तालुक्यात शासनमान्य वाळूअभावी अक्षरशः वाताहत झाली असून हजारो गरीब कुटुंबांचे स्वप्न अधांतरी लटकले आहे.महसूल प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे घरकुल लाभार्थ्यांचे हाल होत असून शासनाच्या योजनाच कागदावरच राहिल्याचे चित्र दिसून येत आहे.



तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण,रमाई आवास योजना,यशवंतराव चव्हाण आवास योजना व अहिल्याबाई होळकर आवास योजना अंतर्गत मोठ्या प्रमाणावर घरकुले मंजूर झाली आहेत.सन २०२४-२५ व २०२५-२६ या कालावधीत १६,७८६ घरकुलांचे उद्दिष्ट ठरवण्यात आले असून त्यापैकी १६,३४२ घरांना मंजुरी देण्यात आली आहे.मात्र वास्तव अत्यंत धक्कादायक असून आजपर्यंत केवळ ९६२ घरे पूर्ण झाली असून प्रगती अवघी ५.८९ टक्के इतकी अत्यल्प आहे.

**वाळूअभावी बांधकामे अर्धवट, गरीब कुटुंबे आर्थिक संकटात**

मंजूर घरांपैकी बहुतांश बांधकामे पाया,स्लॅब,काँक्रीट व प्लास्टर या टप्प्यावर अर्धवट आहेत.अधिकृत वाळू घाट कार्यान्वित नसल्याने लाभार्थ्यांना काळ्या बाजारातून जादा दराने वाळू खरेदी करावी लागत आहे.त्यामुळे शासनाकडून मिळणारे अनुदान अपुरे पडत असून अनेक गरीब कुटुंबे कर्जबाजारी होत आहेत.

वाळूअभावी बांधकाम रखडल्याने शासनाचे टप्प्याटप्प्याने मिळणारे हप्तेही थांबले आहेत.काही लाभार्थ्यांनी खासगी सावकारांकडून कर्ज घेऊन काम सुरू केले असून व्याजाचा आर्थिक बोजा वाढत आहे.शासनाने ठरवलेल्या कालमर्यादेत घर पूर्ण न झाल्यास अनुदान कपात किंवा प्रशासकीय कारवाईचा धोका निर्माण झाला असून लाभार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

**महसूल प्रशासनाची जबाबदारी पण दुर्लक्ष सुरूच**

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन व व्यवस्थापन नियम २०१३ तसेच शासन निर्णयांनुसार वाळू घाटांचे लिलाव व वितरण प्रक्रिया नियमित ठेवणे ही महसूल प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र अंबड तालुक्यात ही जबाबदारी पार पाडली जात नसल्याचा आरोप होत आहे.

घरकुल योजना प्रभावी राबवायची असल्यास बांधकाम साहित्य अधिकृत दरात आणि नियमित उपलब्ध करून देणे अनिवार्य असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**तातडीने वाळू घाट सुरू करण्याची जोरदार मागणी**

ही बाब सार्वजनिक हिताची व तातडीची असल्याने अंबड तालुक्यात त्वरित शासनमान्य वाळू घाट सुरू करून घरकुल लाभार्थ्यांना प्राधान्याने व निर्धारित दरात वाळू उपलब्ध करून द्यावी अशी जोरदार मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे.या निवेदनावर शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजू छल्लारे, माजी सरपंच दशरथ साठे, शिवसेना उपतालुका प्रमुख बंटी आटोळे,सोशल मीडिया प्रमुख राम काळे,ड.राजेंद्र पवार, शिवाजी काळे,सुनील गायकवाड,ड.मोहन रोटे, ग्रामपंचायत सदस्य राजू काकडे,पोलिस पाटील अमीर सय्यद,अशोक आटोळे यांच्यासह शेकडो घरकुल लाभार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**गरीबांच्या घरकुल स्वप्नाला प्रशासनाचा अडसर ?**

शासन गरीबांसाठी घरे देण्याचे आश्वासन देत असताना वाळू माफिया वितरण व्यवस्था आणि प्रशासकीय निष्क्रियतेमुळे गरीबांचे स्वप्न उद्ध्वस्त होत असल्याचा आरोप केला जात आहे.जर तातडीने उपाययोजना करण्यात आल्या नाहीत तर घरकुल योजनांवरच जनतेचा विश्वास उडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



आष्टी - गुरूवार दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी पीएमश्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आष्टा हरिनारायण शाळेत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# वीज चोरांचे धाबे दणाणले! लड्डा कॉलनी व ढोर गल्लीत महावितरणची मोठी कारवाई

### उपकार्यकारी अभियंता राधेश्याम कुमावत यांचा दणका

परतूर ।प्रतिनिधी

महावितरणच्या भरारी पथकाने आणि उपकार्यकारी अभियंता राधेश्याम कुमावत यांनी परिसरात वीज चोरी करणाऱ्यांविरुद्ध मोठी मोहीम उघडली आहे. शहराच्या लड्डा कॉलनी आणि ढोर गल्ली या भागांत अचानक छापेमारी करून अनेक घरांमध्ये सुरू असलेली थेट वीज चोरी पकडण्यात आली आहे. या धडक कारवाई दरम्यान, अनेक वीज ग्राहकांनी मुख्य वाहिनीवर अनधिकृतपणे 'आकडे' टाकून विजेचा वापर केल्याचे निदर्शनास आले. अभियंता कुमावत यांनी स्वतः ही कारवाई करत घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात वीज चोरीसाठी वापरले जाणारे वायर आणि आकडे जप्त केले आहेत. ही सर्व सामुग्री कायदेशीर कारवाईसाठी पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्यात आली असून संबंधित चोरांवर विद्युत कायद्याच्या कलम १३५ नुसार गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. कलम १३५: वीज चोरी करणे हा अजामीनपात्र गुन्हा असून, यात चोरीच्या रकमेच्या तीनपट दंड किंवा कारावासाची शिक्षा होऊ शकते कारवाई दरम्यान जप्त केलेले आकडे आणि वायर हे न्यायालयात पुरावा म्हणून सादर केले जाणार आहेत. तसेच उपकार्यकारी अभियंता राधेश्याम कुमावत यांनी स्पष्ट केले की, यापुढेही अशी



कारवाई सुरूच राहील. प्रामाणिक ग्राहकांना त्रास होऊ नये आणि महावितरणचे नुकसान टाळण्यासाठी अनधिकृत वीज वापरणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे. या कारवाईमुळे परिसरात वीज चोरांचे धाबे दणाणले आहेत. अभियंता कुमावत यांच्या नेतृत्वाखालील पथकाने या दोन्ही गल्ल्यांमध्ये अचानक छापेमारी केली. यावेळी अनेक घरांमध्ये आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांमध्ये मुख्य केबलला 'आकडे' लावून अनधिकृतपणे वीज वापरली जात असल्याचे आढळून आले. पथकाने तात्काळ कारवाई करत चोरीसाठी वापरले जाणारे सर्व आकडे जप्त केले

# शिवजयंती सोहळ्यात अनाईकाचे कौतुक; अण्णांचा लहानग्याशी आपुलकीचा संवाद

आष्टी - (राजेंद्र लाड) शिवजयंतीच्या पावन व उत्साहपूर्ण सोहळ्यात युवा नेते अजय (दादा) भीमराव धोंडे यांची कन्या अनाईका हिच्याशी अण्णांनी साधलेला आपुलकीचा संवाद उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेत होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात विविध सांस्कृतिक उपक्रम, ध्वजारोहण यामुळे वातावरण भारावून गेले होते.

याच वेळी मंचाजवळ उपस्थित असलेल्या लहानग्या अनाईकाला अण्णांनी जवळ बोलावून प्रेमाने गप्पा मारल्या. तिच्या शालेय शिक्षणाबाबत, आवडी-निवडींबाबत असे विविध प्रश्न अण्णांनी विचारले असतील. अनाईकानेही कोणतीही भीती न बाळगता हसतमुखाने व आत्मविश्वासाने उत्तरे दिली असतीलच. तिची निरागस भावना उपस्थितांमध्ये आनंदाची लहर पसरवून गेली.

अनाईकाच्या बोलण्यातील स्पष्टता आणि आत्मविश्वास पाहून अण्णांनी तिचे मनापासून कौतुक केले. आजची पिढी जर शिवचरित्राचे संस्कार मनात बाळगून वाढली, तर देशाचे भवितव्य उज्ज्वल राहील, असे सांगत त्यांनी बालकांमध्ये देशभक्तीची भावना रुजविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. अजय (दादा) धोंडे यांनीही कन्येच्या या सहभागाबद्दल समाधान व्यक्त करत शिवजयंतीसारख्या उत्सवांमधून मुलांना प्रेरणा मिळते, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमात मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते. ढोल-ताशांच्या गजरात आणि जयजयकारात



शिवजयंती साजरी करण्यात आली. लहानग्या अनाईकासोबत अण्णांनी साधलेला हा संवाद कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला आणि उपस्थितांच्या मनात आनंददायी आठवण म्हणून कोरला गेला.

# छत्रपती शिवराय समाज उन्नतीचा अजरामर विचार - प्रा.चौगुले

परळी / प्रतिनिधी

सर्वधर्म समभाव, पर्यावरणवादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले रयतेचे राजे शिवबा हे एक अजरामर विचार असून काही अपप्रवृत्ती छत्रपती शिवरायांना समाज मनावर चुकीच्या पद्धतीने बिंबविन्याच्या प्रयत्न करत असल्याचे मत साहित्यिक प्राचार्य अण्णासाहेब चौगुले यांनी व्यक्त केले. स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती तालुक्यातील महाराष्ट्र माध्य व उच्च माध्य विद्यालय मोहा या ठिकाणी मोठ्या हर्षोल्हासात साजरी करण्यात आली. या जयंती कार्यक्रम प्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणून कोल्हापूर येथील निवृत्त प्राचार्य तथा साहित्यिक अण्णासाहेब चौगुले, अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य मुरलीधर बोराडे ,



उपमुख्याध्यापक सुरेंद्र हरदास, पर्यवेक्षक केशव दीक्षित, जेष्ठ शिक्षक गणेश कुरे आदी मंचावर उपस्थित होते.

पुढे बोलताना कॉ.चौगुले म्हणाले की, उपेक्षित, शोषित, वंचीत समाजासाठी छत्रपती शिवरायांचे विचार जर अंमलात आणले गेले तर सामाजीक उन्नती निश्चित होऊ शकते मात्र समाजात स्वार्थासाठी शिवाजी महाराजांना चुकीच्या पद्धतीने मांडण्यात येत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी छत्रपती शिवरायांचे विचार हे घटनेच्या स्वरूपात संविधानात समाविष्ट करून अंमलात आणण्यासाठी प्रयत्न केले. मात्र घटनेने दिलेले अधिकार, हक्क हिरावून घेण्याचे काम आज केले जात आहे. वाचा, विचार करा आणि व्यक्त व्हा जेणेकरून सामाज सुखमय, आनंदी होऊन समाज परिवर्तन होण्यास मदत होईल असे ही त्यांनी आपल्या प्रमुख व्याख्यानातून सांगितले तर अध्यक्षीय समारोप शाळेचे प्राचार्य मुरलीधर बोराडे यांनी करताना महात्मा ज्योतिबा फुले यांनी सर्वप्रथम रायगडावर छत्रपती शिवरायांनी समाधी शोधून जयंती साजरी केली मात्र आजमितीस शिवरायांना वेगळ्या पद्धतीने समाज मनात रुजविण्यासाठी मोठे पर्यन्त केले जात असल्याची खंत व्यक्त केली. या जयंती उत्सव कार्यक्रमाचे प्रस्तावित गणेश कुरे, सुत्रसंचलन हनुमंत वाघमोडे तर आभार मदन राठोड यांनी केले.



नांदेड प्रतिनिधी

दि १९ फेब्रुवारी २०२६ रोज गुरूवारी दुपारी १ वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी सार्वजनिक वाचनालय होळकर नगर सिडको नांदेड येथे छत्रपती शिवाजी महाराज, संत सेवालाल, संत गुरू रविदास, संत गाडगेबाबा यांच्या जयंती निमित्ताने वाचक मेळावा रासपचे जिल्हाध्यक्ष चिवळीचे सरपंच संदीप जायनुरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.कार्यक्रमात वाचनालयाचे संस्थापक अध्यक्ष प्रबोधनकार गोविंदराम शूरनर यांच्या वाढदिवसाचेऔचित्य साधून व नवनिर्वाचित नगरसेवक व त्यांचे प्रतिनिधी गंगाप्रसाद काकडे, सतिश बसवदे, नगरसेवक वैजनाथ देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

# अर्धापुरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य आरोग्य व रक्तदान शिबीर

अर्धापूर प्रतिनिधी: छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून अर्धापूर येथे भव्य आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात केवळ आरोग्य तपासणीच नाही, तर गरजू रुग्णांवर प्रत्यक्ष औषधोपचारही करण्यात आले. या शिबिराला शिवप्रेमी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. 'जय भवानी, जय शिवाजी' जय जिजाऊ जय शिवराय च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. सामाजिक बांधिलकी जपत शिवजयंती साजरी करण्याच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या शिबिरामध्ये नागरिकांसाठी विविध आरोग्य चाचण्यांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये प्रामुख्याने

रक्तदान शिबीरामध्ये तरुणांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक कर्तव्य पार पाडले.मधुमेह व रक्तदाब तपासणी अनेकांनी करून घेतली. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्रकारच्या आजारांचे निदान करण्यात आले. केवळ तपासणीवर न थांबता, पात्र रुग्णांना जागेवरच आवश्यक औषधे उपलब्ध करून देण्यात आली. या सामाजिक उपक्रमाला प्रशासकीय आणि पोलीस दलातील अधिकाऱ्यांनी भेटी देऊन आयोजकांचे कौतुक केले. यावेळी प्रामुख्याने उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ, नायब तहसीलदार राजेंद्र शिंदे, गटविकास अधिकारी यु. डी. तोटावाड, ग्रामीण रुग्णालय अधीक्षक डॉ. विद्या झिने, सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णूकांत कराळे, पोलीस उपनिरीक्षक

सुरेश भोसले, सुभाष मुंगल, डॉ.उत्तम इंगळे, डॉ.विशाल लंगडे, डॉ.युवराज डाढाळे यांच्यासह ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि सर्वपक्षीय पदाधिकारीसह शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वीतेसाठी अनेकांनी परिश्रम घेतले.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
राजमान्य-राजशक्ती

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )

नांदेड

शुक्रवार दि.२० फेब्रुवारी २०२६
FRIDAY, DT.20 FEBRUARY 2026



# शिवरायांना डोक्यावर घेऊन नाचण्या पेक्षा त्यांना डोक्यात घ्या

## डॉ. आशालता गुट्टे : अभिवक्तासंघा च्या वतीने कंधारमध्ये शिवजयंती साजरी



कंधार /प्रतिनिधी

तरुणांनी वेसणाधीन न होता शिवबांचे विचार आत्मसात करावे. सोबतच स्त्रियांचा आदर करावा. शिवचरित्र जागृत झाले पाहिजे. शिवबांचे विचार तरुणांनी अंगीकृत करणे काळाची गरज असून शिवरायांना डोक्यावर घेऊन नाचण्यापेक्षा त्यांना डोक्यात घेण्याची गरज असल्याचे डॉ.आशालता गुट्टे यांनी सांगितले.

शिवजयंती निमित्त कंधार तालुका अभिवक्ता संघाच्यावतीने न्यायालय परिसरात छत्रपती शिवरायांचे विचार आणि आजची तरुण पिढी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. ड. बी. व्ही. आलाबदे अध्यक्षस्थानी होते. जिल्हा न्यायाधीश एन. एम. पाटील, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठस्तर) आर. के. गुज्जर, पोलिस निरीक्षक चंद्रकांत जाधव, अभिवक्ता संघाचे अध्यक्ष ड. बी. के. पांचाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. आशालता गुट्टे पुढे म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराज हे भारताच्या इतिहासातील अजरामर योद्धे व आदर्श नेतृत्वाचे प्रतीक आणि स्वराज्य स्थापक होते. त्यांचे जीवन केवळ रणांगणातील पराक्रमापुरते नव्हते तर त्यांच्या धोरणी बुद्धिमत्ता, नीतिमत्ता आणि लोककल्याणकारी दृष्टिकोन प्रेरणादायी आहे. आजच्या तरुणांना त्यांची शिकवण उपयोगी ठरू शकते, असेही त्यांनी म्हंटले.

यावेळी शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष ड. बाबू पाटील,ड. डी. जी. कुट्टे, ड. यु. पी. वाघमारे, ड. लक्ष्मीकांत मुखेडकर, ड. एम. जी. सोनकांबळे, ड. पांडुरंग कदम, अड. मिलिंद सोनकांबळे, सरकारी वकील ड. महेश कागणे, ड. प्रफुल्ल शेंडगे, ड. दिगंबर गायकवाड, ड . हफीज घडीवाला, ड. हणमंत कुटे, ड. राहुल ढवळे, ड. भास्कर भुजबळ, ड. माधव गुंजाळे, ड. महेश कारामुंगे, ड. श्रेयस धर्मापुरीकर, ड. सुहास मस्के, ड. सागर डोंगरजकर, ड. गजानन बनसोडे, ड. सागर मुखेडकर, ड. रवी कांबळे आदी उपस्थित होते. ड. रवी केंद्रे यांनी प्रस्ताविक केले. ड. अभय देशपांडे यांनी सूत्रसंचलन केले. ड. दिलीप कुरुडे यांनी आभार मानले.

# सरसम जवळ कार दुचाकीची समोरासमोर धडक

## एक जण जागीच ठार, एकाचा उपचारासाठी जात असतांना मृत्यू.

हिमायतनगर प्रतिनिधी

तालूक्यातील सरसम बु. फाटच्याजवळ कार दुचाकीची समोरासमोर धडक,या दुर्घटनेत दुचाकीवरील एकजण जागीच ठार झाला आहे. तर एकाला उपचारासाठी नांदेडला घेऊन जात असतांना अर्ध्या रस्त्यातच त्याचाही दुर्दैवी मृत्यू झाला आहे. हि घटना दि. १९ फेब्रूवारी गुरूवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास घडली आहे.

नांदेड,किनवट राज्य महामार्गावर हिमायतनगरकडून चारचाकी वाहन टाटापंच एम. एच. २६ सि.पी. ५०८० ही भोकरकडे जात होती. त्याच दरम्यान् भोकरकडून दुचाकी एम. एच. २६ बी. एम. ८८९४ ही हिमायतनगरकडे येत होती. सरसम बु. बसस्टँन्ड जवळ दुसर्या एका वाहणाला ओव्हरटँक करण्याच्या नादात चारचाकी व दुचाकीची समोरासमोर जबरदस्त धडक झाली. या दुर्घटनेत दुचाकीवरील गजानन लक्ष्मण पांचाळ वय अंदाजे ४० रा. सरसम बु. ता. हिमायतनगर यांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर




दुचाकीवरील शंकर पंडीतराव सर्जे ( देशमूख ) वय ५५ रा. सरसम बु ता. हिमायतनगर यांचा जखमी अवस्थेत उपचारासाठी नांदेडला घेऊन जात असतांना रस्त्यातच दुर्दैवी मृत्यू झाला आहे. घटनास्थळी हिमायतनगरचे पोलीस दाखल होवून पंचनामा केला आहे. दरम्यान् एकाच गावातील दोघाचा अपघातात मृत्यू झाल्याची बातमी पंचक्रोशित वाऱ्या सारखी पसरली. या घटने बाबत हिमायतनगर पोलीस ठाण्यात चारचाकी वाहनधारकाविरूद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती तर या दुर्दैवीअपघाता मुळे सरसम या गावातील गावाकऱ्यात हळहळ व्यक्त केली जात होती .

# कर्तव्यनिष्ठ अधिकारी शेख गुलाबसाब, यांचे दुःखद निधन गोरगरीब, तळागाळातील नागरिकांना तत्काळ मदत करणारा आधारवड हरपला.

मुखेड /प्रतिनिधी :- सेवानिवृत्त सहायक महसूल अधिकारी शेख गुलाबसाब, यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच परिसरात शोककळा पसरली असून सर्व स्तरातून हळहळ व्यक्त होत आहे.

शेख गुलाब यांनी आपल्या सेवाकाळात प्रामाणिकपणा, कर्तव्यदक्षता आणि लोकाभिमुख कार्यपद्धती यांचा आदर्श ठेवला. विशेषतः गोरगरीब, वंचित व तळागाळातील लोकांना शासनाच्या विविध योजना व मदतीचा लाभ तात्काळ मिळवून देण्यासाठी ते सदैव तत्पर असत. कोणत्याही नागरिकाला शासकीय दारात अडवून न ठेवता, त्यांचे प्रश्न समजून घेत मार्गदर्शन व सहकार्य करणे ही त्यांची कार्यशैली होती.

त्यांच्या कार्यामुळे समाजात त्यांच्याबद्दल विशेष आदर आणि विश्वास निर्माण झाला होता. साधेपणा, माणुसकी आणि न्यायप्रिय वृत्ती यामुळे ते सर्वांच्या मनात घर करून होते. त्यांच्या जाण्याने समाजातील एक कर्तव्यनिष्ठ, संवेदनशील अधिकारी हरपल्याची भावना व्यक्त होत आ ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व त्यांच्या परिवाराला या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो, हीच प्रार्थना.

सेवानिवृत्त सहायक महसूल अधिकारी शेख गुलाबसाब, यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच परिसरात शोककळा पसरली असून सर्व स्तरातून हळहळ व्यक्त होत आहे.

# अर्धापूर –तामसा ओबडधोबड 'रस्ता' असल्याने ३० फूट खोल दरीत ॲटो कोसळला सहा प्रवाशी जखमी

अर्धापूर/ प्रतिनिधी प्रशासनाचा निष्काळजीपणा 'ओबडधोबड' कारभाराचा फटका आज सहा निष्पाप प्रवाशांना बसला झटका अर्धापूर–तामसा राष्ट्रीय महामार्गावरील लोणी गावाजवळ एका टो रिक्षेचा भीषण अपघात झाला. चालकाचे नियंत्रण सुटल्याने प्रवाशांनी भरलेली आपे टो रिक्षा थेट ३० फूट खोल दरीत कोसळला. या घटनेत एका बालकासह सहा जण जखमी झाले असून, तिघांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याची माहिती समोर येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चेनापूर तांडा येथील प्रवाशांना घेऊन हा टो रिक्षा 'लहान' मार्गे अर्धापूरकडे येत होता. लोणी गावाजवळ असलेल्या जुन्या नदीच्या पुलाजवळ रस्ता इतका खराब आणि ओबडधोबड आहे की, चालकाला रिक्षेवर नियंत्रण ठेवणे अशक्य झाले. अनियंत्रित झालेली रिक्षा थेट पुलाच्या बाजुला रस्त्यावरून २५–३० फुट खाली दरीत कोसळली. रिक्षेचा अक्षरशः चक्काचूर झाला असून प्रवाशांच्या ओरडण्याने परिसर हादरून गेला. अपघात घडताच परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी १०८ रुग्णवाहिका, महामार्ग पोलीस आणि जगद्गुरु नरेंद्रचार्य रुग्णवाहिकेचे पथक तातडीने घटनास्थळी पोचले यावेळी चालक राजू पाचंगे, संभाजी कल्याणकर, डॉ. रमेश वरवटकर, राजु धाडवे आणि जसप्रीतसिंग शाहु यांनी जखमींना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले. तर बाजार समितीचे सभापती संजय लहानकर, पोलीस पाटील आनंद इंगळे, भास्कर वैध, प्रकाश लोणे यांनी बचाव कार्यात मोलाचे सहकार्य केले.

जखमींना तात्काळ अर्धापूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, गंभीर जखमी असल्याने तिघांना विष्णुपुरी (नांदेड) येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले यात शकुंतला दशरथ पवार (४६), रा. अर्धापूर, पुजा आकाश चव्हाण (२६), रा. चेनापूर तांडा, रंजना लक्ष्मण राठोड (३०), रा. चेनापूर तांडा असुन याव्यतिरिक्त भुलनबाई दिलीप चव्हाण (५०), रोहन विजय पवार (२५) आणि एका लहान बालक रा चेनापूर तांडा यांच्यावर अर्धापूर येथे उपचार सुरू आहेत.

प्रवासी संताप्त 'रस्ते की मृत्यूचे सापळे?'

या महामार्गावरील ओबडधोबड रस्त्यांमुळे अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाहीये. प्रशासन अजून किती बळी जाण्याची वाट पाहत आहे? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक विचारत आहेत.

# स्वारातीम विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

नांदेड /प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये आज गुरुवार, दि.१९ फेब्रुवारी, २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्ध्याकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.मारुती गायकवाड,उपकुलसचिव डॉ. रवि सरोदे, सहा. कुलसचिव रामदास पेद्देवाड,

जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, गोविंद हंबर्डे, संदीप लुटे, जालिंदर गायकवाड, संभाजी धनमने व गोपिराज हंबर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी विद्यापीठातीलप्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्ध्याकृती पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# एआयचे ज्ञान आत्मसात करणे काळाची गरज

## कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांचे पत्रकारांना आवाहन



अनिल धमने पाटील
नांदेड जिल्हा प्रतिनिधी

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) बद्दल भीती न बाळगता ते शिकवून घ्यावे. एआयमुळे कार्यालयीन कामकाज करावयास खूप मदत होते. जवळपास सर्वच क्षेत्रात एआयची गरज दिवसें दिवस वाढत आहे. एआयचा वापर करतांना त्याला विचारात येणारे प्रश्न जर योग्यरीत्या विचारले तर आपणास चागल्या प्रकारची माहिती प्राप्त होते. यामुळे वेळेची बचत होते. त्यामुळे पत्रकारितेच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हे प्रभावी साधन ठरत असून त्याची भीती न बाळगता ते आत्मसात करणे ही काळाची गरज असल्याचे मत कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी व्यक्त केले.

ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अधिसभा सभागृहात दि.१८ फेब्रुवारी, २०२६ रोजी आयोजित आधुनिक पत्रकारिता कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, आदींची उपस्थिती होती तर मार्गदर्शक म्हणून जेष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार, विशाल पाटील, फराह खान, नंदकिशोर पाटील, प्रियदर्शनी हिंगे, संतोष शाळीग्राम, डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी यांची प्रमुख उपस्थिती होती. जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनी संयोजन केले.

पत्रकारितेत माहितीवरील मक्तेदारी संपुष्टात आली असून प्रत्येक व्यक्ती कंटेंट निर्माण करू शकते, असे मत ज्येष्ठ संपादक व विचारवंत, दै.सकाळ, पुणेचे डॉ. श्रीराम पवार यांनी मांडले. अशा परिस्थितीत सत्य पडताळणी, संदर्भांची अचूकता आणि सार्वजनिक हिताची जाणीव हेच पत्रकारांचे वैशिष्ट्य

ठरते, असे त्यांनी सांगितले. वेगाच्या स्पर्धेत संवेदनशीलता आणि

सत्यता अबाधित ठेवणे हीच खरी कसोटी असल्याचे त्यांनी नमूद केले. तर लोकशाही, मुंबईचे मॅनेजिंग एडिटरविशाल पाटील यांनी संवाद कौशल्य, स्पष्टता आणि समाजाभिमुख दृष्टिकोन यांचे महत्त्व अधोरेखित केले. तंत्रज्ञान हे केवळ सहाय्यक साधन असून पत्रकारितेचा केंद्रबिंदू नागरिकांच्या प्रश्नांवरच असावा, असे त्यांनी स्पष्ट केले. आणि दैनिक लोकमत, छत्रपती संभाजीनगरचे संपादक नंदकिशोर पाटील यांनी पत्रकारिता ही सतत शिकत राहण्याची प्रक्रिया असल्याचे सांगत व्हायरल संस्कृतीच्या काळात संयमी आणि तथ्याधारित वृत्तांकनाची गरज अधिक असल्याचे नमूद केले. यावेळी न्यूज १८ मराठी, मुंबईच्या सहसंपादक फराह खान यांनी एआयमुळे शोध पत्रकारिता, डेटा विश्लेषण आणि तथ्य पडताळणी अधिक प्रभावी होत असल्याचे सांगितले. मात्र गोपनीयता धोक्यात येणे, सायबर गुन्हे, चुकीची माहिती आणि तंत्रज्ञानावर अति अवलंबित्व

यांसारख्या बाबीं विषयी सतर्क राहण्याची आवश्यकता असल्याचा इशारा त्यांनी दिला.

आयक्यूएसी सेलचे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी यांनी विद्यापीठाच्या राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक यशाचा उल्लेख करत पत्रकारांनी नकारात्मक घटनांबरोबरच संशोधन, नवकल्पना आणि शैक्षणिक प्रगती यांची माहितीही

समाजापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन केले. तर मॅक्स वुमन चैनल, मुंबईच्या संचालिका प्रियदर्शनी हिंगे यांनी माध्यमांतील महिलांविषयीच्या रूढ प्रतिमांवर भाष्य करत पत्रकारितेत संवेदनशीलता आणि पूर्वग्रहविरहित दृष्टी आवश्यक असल्याचे सांगितले. समाजातील सर्व घटकांना न्याय्य प्रतिनिधित्व देणे ही माध्यमांची जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. आणि दै.सकाळ, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय संपादक संतोष शालिग्राम यांनी एआयमुळे बातमी करणे आता अत्यंत सोपे झाले असून, मराठी पत्रकारितेतही याचा लाभ घेता येऊ शकतो. माहितीचे संकलन, भाषांतर, बातमीचा मसुदा तयार करणे यासारख्या अनेक प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करता येतात. विशेषतः चॅटजीपीटीच्या माध्यमातून पत्रकारांना विविध विषयांवरील माहिती झटपट मिळवता येते, भाषेतील अडचणी दूर करता येतात आणि बातमीला वेगवेगळे कोन देऊन सादर करता येते, असे मत त्यांनी व्यक्त केले. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून कार्यशाळेचा प्रारंभ झाला, तर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.राजेंद्र गोणारकर यांनी केले. या कार्यशाळेस विद्यापीठ परिक्षेत्रातील पत्रकारांची मोठ्या संख्येने यावेळी उपस्थिती होती.

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त किनवट शिवमय

किनवट /प्रतिनिधी

स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे खरे राजे आणि शौर्य, धैर्य व न्यायनिष्ठेचे अजरामर प्रतीक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त किनवट शहर भगव्या उत्साहात न्हाऊन निघाले. नगर परिषद किनवट येथील मुख्य अभिवादन कार्यक्रमापासून ते सायंकाळच्या भव्य मिरवणुकीपर्यंत दिवसभर विविध उपक्रमांनी शिवजन्मोत्सव दिमाखात साजरा करण्यात आला. जय शिवाजी, जय शिवराय, जय भवानी-जय शिवाजी व हर हर महादेवच्या घोषणांनी शहर दुमदुमले.

नगर परिषदेत अभिवादन सोहळा

नगर परिषद सभागृहात आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी उपनगराध्यक्ष मोहम्मद हसन खान पठाण होते. रा.कॉ. नेत्या बेबीताई प्रदीप नाईक यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रारंभी शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सर्व सन्माननीय नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते. त्यामध्ये श्रीराम नारायणराव नेम्मानिवार (सभापती, सार्वजनिक बांधकाम समिती), श्रीमती अश्विनी आदर्श जागरलावार (सभापती, स्वच्छता व आरोग्य समिती), श्रीमती प्रिती धिरज नेम्मानिवार (सभापती, महिला व बालकल्याण समिती), श्रीमती निलोफर निसार भाटी (सभापती, पाणी पुरवठा समिती), श्रीमती नुरसबा शेख मुकद्दर (सभापती, क्रीडा व सांस्कृतिक समिती) तसेच नगरसेवक संतोष किशनराव मरस्कोल्हे, गटनेते अभय मधुकर नगराळे, अपक्ष नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार, सरोजिनी बाबुराव ओद्दीवार, प्रविण इंद्रसिंग राठोड, ललिताबाई मारोती मुनेश्वर, सुरज किशनराव सातुरवार, गंगाबाई नारायणराव कोल्हे, तसेच स्वीकृत सदस्य साजिद खान निसार खान उपस्थित होते.

याशिवाय माजी जि.प. उपाध्यक्ष प्रकाश गब्बा राठोड, माजी जि.प. सदस्य बंडू नाईक, ड. राहुल नाईक,



उपसभापती राहुल नाईक, स्वागत आयनेनिवार, धिरज नेम्मानिवार, शहर प्रमुख प्रशांत कोरडे, राजेश जोशी, राजू सातुरवार, साहिल सिरमनवार, आदर्श जागर्लावार, प्रभू कोल्हे, मुक्कदर शेख, मुकेश नेम्मानिवार, ड. दिनेश येऊतकर, शिवसेना महिला तालुका संघटक मंगल तोकलवाड, प्रा. जयश्री भरणे, संगिता आडे, सागर गायकवाड व बांडी यांची उपस्थिती होती. मुख्याधिकारी मुगाजी काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव, लेखापाल विष्णू पुजारी, अभियंता सुरज साखळे, नगर रचना अभियंता स्वानंद मामीडवार, करनिर्धारक शिवराम काहीतवाड, पाणी पुरवठा सहाय्यक राजू पिल्लेवार, तसेच किरण कलगोटूवार, फारुख खत्री, परमेश्वर कचमोडे, लक्ष्मण कोल्हे, साहिल कशेटवर, राजू उदगीरवार, जमीरोद्दीन, किरण दुधीवार, मोहनिश ढंडोरे, गंगाधर दोनपेल्लीवर व इतर सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

किनवट शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित भव्य कार्यक्रम

विविध स्पर्धा व रक्तदान शिबिर:

सार्वजनिक जयंती उत्सव समितीतर्फे विद्यार्थ्यांसाठी रंगभरण, निबंध, वक्तृत्व व लेझीम स्पर्धा घेण्यात आल्या. 'छत्रपती शिवाजी महाराज व स्त्री सुरक्षितता', 'मां जिजाऊं ची शिवरायांना शिकवण' आणि 'निधर्मी राजा-छत्रपती शिवाजी महाराज' या विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रभावी सादरीकरण केले. विजेत्यांना प्रथम पारितोषिक ३००१ रुपये व द्वितीय पारितोषिक २००१ रुपये देण्यात आले. मराठवाडा रक्तनिदान केंद्रातर्फे कलावती ब्लड बँक, आदिलाबाद यांच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबिरात सुमारे ६२ शिवप्रेमींनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

दुचाकी रॅली व भव्य मिरवणूक:

गोकुंदा ते छत्रपती चौकापर्यंत तरुणांनी शिस्तबद्ध दुचाकी रॅली काढली. सायंकाळी शिवाजी चौकातून शिवप्रतिमेची भव्य मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. पारंपरिक वाद्यांचा गजर, आकर्षक सजावट आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे मिरवणूक उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरली. एकूणच, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त किनवटमध्ये राष्ट्राभिमान, सामाजिक एकात्मता आणि शिवरायांच्या विचारांचा जागर अनुभवायला मिळाला. सर्व मान्यवर, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी व नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिवजन्मोत्सव ऐतिहासिक व संस्मरणीय ठरला. यावेळी छत्रपती चौकात सकाळी ११ वाजता नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी श्रीमती बेबीताई प्रदीप नाईक, डॉ. अशोक सूर्यवंशी, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, के. मुर्ती, उपनगराध्यक्ष हसनलाला नूरखान पठाण, युवा नेते क्रांतीशरण केराम, रोहन एंड्रलवार, नगरसेवक सूरज सातुरवार, प्रवीण राठोड, अभय महाजन, मारोती मुनेश्वर, प्रशांत कोरडे, राम नेम्मानीवार, अनिल पाटील कऱ्हाळे, राहुल नाईक, सचिन नाईक, शिवा पवार, सुमित माने, आकाश इंगोले, विशाल पावडे, अक्षय शिंदे, सतीश नेम्मानीवार, सचिन कदम, दगडू भरकड, सुशील कदम, सागरताई शिंदे, विद्या पाटील, जयश्री भरणे, गंगुबाई परेकार यांच्यासह शेकडो शिवप्रेमी उपस्थित होते.तर किनवट तालुक्यातील गोकुंदा, बोधडी, शनिवारपेठ, घोटी, मांडवी, उमरी, जलधारा, इस्लापुर, शिवणी या ठीकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये मोठ्यासंख्येने शिवप्रेमींनी सहभाग नोंदवला.